मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
मुंबई/ पालघर | मुंबई, रविवार, २९ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ९९ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये
Email : vrittamanas1@gmail. com

## महाराष्ट्राला इतर राज्यांकडून प्रेरणा घेण्याची गरज नाही - फडणवीस

**मुंबई:** उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बुलडोझर कारवाई आणि एन्काउंटरची प्रेरणा उत्तर प्रदेश सरकारकडून घेतली का? असा सवाल एका मुलाखतीत विचारण्यात आला. यावर फडणवीस म्हणाले, "उत्तर प्रदेश सरकारकडून प्रेरणा घेण्यासाठी इतर अनेक गोष्टी आहेत. त्यांनी राम मंदिर बांधले, याची प्रेरणा घेऊ. पण एन्काउंटरची प्रेरणा घ्यायची आम्हाला गरज नाही. एकेकाळी विकास करण्यात फक्त महाराष्ट्र आघाडीवर होता. आज उत्तर प्रदेशही त्यांच्या राज्यात विकास कामे करत आहे, याचा आनंद आहे. पण आपले महाराष्ट्र हे सर्वांच्या पुढे गेलेले राज्य आहे. महाराष्ट्राला इतर राज्यांकडून प्रेरणा घेण्याची गरज नाही.



जम्मू-काश्मीरमध्ये भाजप पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन करणार पान 8

# आनंद दिघेंना मारलं गेलं!

## शिंदे सेनेच्या आमदार शिरसाटांचे धक्कादायक वक्तव्य

### दिघे साहेबांचा घात झाला !

संजय शिरसाट म्हणाले, "मी दिघेसाहेबांच्या अपघाताच्या दिवसांपासून सगळं पाहिलं आणि अनुभवलं आहे. तिथे मी गेलेलोही आहे. अपघातानंतरची परिस्थितीही मी पाहिली आहे. दिघेंच्या डोक्याला मार लागला नव्हता. त्यांना जिथे मार लागला होता त्यामुळे मृत्यू होण्याचं कारणच नव्हतं. मग डिस्चार्ज दिल्यानंतर त्यांना हार्टअटॅक कसा आला? त्यामुळे ठाण्यातील लोक म्हणतात की दिघे साहेबांना मारलं गेलं. दिघे साहेबांचा घात झाला. आनंद दिघे यांच्या मृत्यूबाबत वेगवेगळ्या स्टोरीज आहेत. त्यांना कोणतं इंजेक्शन दिलं गेलं? त्यामुळे हृदयात फुगा तयार झाला आणि अटॅक आला. त्यामुळे हार्टवर परिणाम होऊन त्यांचा मृत्यू झाल्याचं अनेकांचं म्हणणं आहे. परंतु, त्या काळात या प्रकरणाची चौकशी व्हायला हवी होती. आनंद दिघेंना कोणी मारलं असेल? असं त्यांना विचारलं असता ते म्हणाले, "या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. कारण यासंदर्भात माझ्याकडे पुरावे नाहीत. मी कुणावर थेट आरोप करू शकत नाही. साक्षीदार कधीतरी बाहेर येतील."

प्रतिनिधी
मुंबई

धर्मवीर आनंद दिघे यांच्या जीवनावर आधारित धर्मवीर 2 हा चित्रपट शुक्रवारी प्रदर्शित झाला. या चित्रपटातील काही दृष्यांमुळे वाद निर्माण झाला आहे. या वादांवर बोलताना शिंदे सेनेतील आमदार संजय शिरसाट यांनी आज गंभीर आरोप केला. आनंद दिघे यांची हत्या झाली होती, हे संपूर्ण ठाणे जिल्हा जाणतो, असं ते म्हणाले. यावरून आता पुन्हा एकदा मोठा वाद उफाळून येण्याची शक्यता आहे. आज त्यांनी माध्यमांशी बोलताना हे भाष्य केलं.



आनंद दिघेंना खांद्यावर घेऊन खरंच एकनाथ शिंदे गेले होते का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता त्यावर ते म्हणाले, त्यावेळची परिस्थितीतीच तशी होती. आनंद दिघेंना मारलं गेलंय, हे संपूर्ण ठाणे जिल्हा जाणतो. दुपारी आनंद दिघेंना डिस्चार्ज देण्यात येणार होता. पण अचानक त्यांचं निधन झालं. बोलता चालता निधन कसं झालं? या सर्व गोष्टी कालांतराने समोर येतील. त्या हॉस्पिटलला आग लागली होती. रुग्णालयात असंख्य रुग्ण होते. त्या सर्वांना वाचवायचं काम शिवसैनिकांनी केलं. त्यात एकनाथ शिंदे अग्रस्थानी होते. एवढाच त्या दृष्याचा अर्थ आहे. पण एकनाथ शिंदे हायलाईट झाले की हे लोक हायपर होतात.

### चित्रपट पाहू नका - केदार दिघे

लोकांनी धर्मवीर चित्रपट पाहूच नये, असे आवाहन करत केदार दिघे म्हणाले की, आनंद दिघे यांचे आयुष्य हे खूप वेगळे होते. त्यांचा संबंध आज सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा होता, त्यांनी जो दाखवलेला आहे, तो स्वतःवरती केंद्रित असा दाखवलेला आहे. चित्रपटातून आनंद दिघे थोडा वेळ दाखवायचे आणि बाकी पूर्ण वेळ तुमची इमेज बिल्डिंग करण्याचा जो प्रयत्न करण्यात आला आहे हे लोकं समजू शकत नाहीत किंवा लोकं एवढे मूर्ख आहेत, असं कोणीही समजू नये. लोकांना तुम्ही केलेली गद्दारी हे व्यवस्थित लक्षात आहे, निवडणूक आली की तुम्ही आनंद दिघेंच्या नावाचे भांडवल करण्याचे काम करत आहात, असा टोला केदार दिघेंनी लगावला आहे. त्यामुळे आता धर्मवीर-2 वरून आणखी काय काय राजकारण रंगते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

## महात्मा फुले-सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी
नाशिक

नाशिक शहरात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या भव्यदिव्य स्मारक उभारण्यात आले आहे. या स्मारकाचे आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री दादाजी भुसे यांचीही उपस्थिती होती. हे भारतातील सर्वात मोठे अर्धाकृती ब्राँझ धातूचे शिल्प आहे. नाशिक शहरातील मुंबई-नाका येथे हे स्मारक उभारण्यात आले आहे.



महात्मा फुले व सावित्रीबाई यांना जिवंतपणी अनेक समाजाकडून अडथळे निर्माण करण्यात आले. त्यांच्या निधनानंतर देखील त्यांच्या विचारांवर हल्ला करून ते नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. मात्र त्यांचे अभेद्य विचार कायम राहिले आहे. त्याचप्रमाणे मुंबई नाक्यावर उभारलेले हे पुतळे अतिशय मजबूत असून ते अभेद्य राहतील असे सांगत महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे विचार समाजात रुजविण्यासाठी अविरत काम करू असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. पान 8 वर

## पारदर्शक वातावरणात विधानसभा निवडणुकांचे नियोजन - राजीव कुमार

### मतदानाचा टक्का वाढवण्याचे आवाहन

प्रतिनिधी
मुंबई

महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुका पारदर्शकपणे निर्भय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या असून लोकशाहीच्या या उत्सवात महाराष्ट्रातील सर्व मतदारांनी विशेषतः शहरी भागातील मतदारांनी उस्फुर्तपणे सहभागी होत मतदानाचा टक्का वाढवावा, असे आवाहन केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी येथे केले.

हॉटेल ट्रायडंट येथे आगामी विधानसभा निवडणुकांच्या तयारीच्या अनुषंगाने यंत्रणांचा




आढावा घेतल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत राजीव कुमार माध्यमांना संबोधित करत होते. निवडणूक आयुक्त सर्वश्री ग्यानेश कुमार, डॉ.सुखबीर सिंह संधू, वरिष्ठ उप निवडणूक आयुक्त सर्वश्री धर्मेंद्र शर्मा, नितेश व्यास, मनीश गर्ग, उप निवडणूक आयुक्त सर्वश्री हर्देश कुमार, अजित कुमार, मनोजकुमार साहू, संजय कुमार, सह संचालक अनुज चांडक आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम उपस्थित होते.

राजीव कुमार यांनी सांगितले की, महाराष्ट्रात एकूण २८८ मतदार संघ असून सर्वसाधारण मतदार संघ २३४, अनुसूचित जमातींसाठी राखीव २५ तर अनुसूचित जातींसाठी २९ मतदारसंघ राखीव आहेत. राज्यात एकूण ९.५९ कोटी मतदार आहेत. त्यापैकी ४.९५ कोटी पुरुष तर ४.६४ कोटी महिला मतदार आहेत. तर तृतीयपंथी ५९९७, दिव्यांग ६.३२ लाख इतके मतदार आहेत. ८५ पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांची संख्या १२.४८ लाख आहे. तर १८ ते १९ या वयोगटातील नवमतदारांची संख्या १९.४८ लाख इतकी आहे. राज्यात राबवण्यात येत असेलल्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमामुळे महिला मतदारांची नोंदणी मोठ्या संख्येने वाढलेली असून १०.१७ लाख या प्रमाणात झालेली वाढ ही अभिनंदनीय बाब आहे. पान 8 वर

## राहुल गांधी हे खोटारड्यांचे सरदार विहिंपचा टोला

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे 'खोटारड्यांचे सरदार' असून हिंदू धर्माची बदनामी करण्याची एकही संधी ते सोडत नाहीत, असा घणाघात विश्व हिंदू परिषदेने (विहिंप) शनिवारी केला.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नुकतेच एका प्रचारसभेत अयोध्येतील श्रीराम मंदिरातील श्रीरामलला प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम म्हणजे केवळ नाचगाण्यांचा कार्यक्रम होता, असे बेताल वक्तव्य केले होते. त्यास विहिंपचे संयुक्त सरचिटणीस डॉ. सुरेंद्र जैन यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले, काँग्रेस नेते राहुल गांधी हे खोटारड्यांचे सरदार आहेत. भारत देश, भारताची संस्कृती आणि हिंदू धर्माची बदनामी करण्याची एकही संधी ते सोडत नाहीत. पान 8 वर

## अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरण निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमावी

### पोलिसांच्या निलंबनासाठी जनहित याचिका

प्रतिनिधी
नवी दिल्ली/ ठाणे

बदलापूरच्या अक्षय शिंदेंच्या एन्काउंटर प्रकरणात आता नवीन माहिती समोर आली आहे. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असून या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या माध्यमातून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणातील पोलिस अधिकाऱ्यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित ठेवण्यात यावे अशी मागणी देखील याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

अक्षय शिंदेचे एन्काउंटर फेक असल्याचा आरोप विरोधकांनी देखील केला आहे. इतकेच नाही तर मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर न्यायालयाने देखील हे एन्काउंटर वाटत नसल्याचे निरीक्षण नोंदवले होते. त्यात आता या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तिढा आता आणखी वाढणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाला वेगळेच राजकीय वळण लागले असल्याचे यामुळे बोलले जात आहे.

## सिनेटचा विजय ही फक्त सुरुवात, विधानसभेलाही गुलाल उधळणार...

### आदित्य ठाकरे यांचा निर्धार

प्रतिनिधी
मुंबई

मुंबई विद्यापीठ सिनेट निवडणुकीत 10 पैकी 10 जागा शिवसेना युवासेनेन जिंकल्या. त्यानंतर शनिवारी मातोश्री निवासस्थानाबाहेर शिवसैनिकांनी जल्लोष केला. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे नेते, युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी उपस्थित शिवसैनिकांशी संवाद साधला. सिनेटच्या निवडणुकीत दिसलेला हा 'दस का दम' आहे. ही फक्त सुरुवात असून विधानसभेचा गुलाल उधळायचा आहे, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.

विजय काय असतो, ते आपण दाखवून दिलं आहे, करुन दाखवलं



आहे. असाच विजय आपल्याला विधानसभा निवडणुकांमध्ये मिळवायचा आहे, त्याची ही सुरुवात आहे. या विजयातून निष्ठा काय असते, ते दाखवून दिले आहे. राजन कोळंबकर यांनी हे सिद्ध केलं आहे. विजयाचा सर्वात पहिला सन्मान राजन कोळंबकर यांचा आहे. राजन यांनी निष्ठा काय असते हे दाखवून दिलं आहे. मागच्या दोन्ही टर्ममध्ये ते सिनेट सदस्य होते. यावेळी त्यांना सांगितलं तुम्हाला थांबावं लागेल. काही चेहरे बदलायचे आहेत. नवीन नावं द्यायचं आहे. ते म्हणाले, तुम्ही कुणालाही उमेदवारी द्या. मी दहाच्या दहा लोकांना निवडून आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असं राजन म्हणाले होते. ते त्यांनी खरे करून दाखवले, असे ते म्हणाले.

असाच विश्वासाचा माणूस म्हणजे सूरज चव्हाण. त्याची भिती वाटत असल्यानेच मिंधे आणि भाजपने त्याला आत टाकले आहे. आता लवकरच विधानसभेचा विजय साजरा करताना तो आपल्यासोबत असेल, असा विश्वासही आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.

## मुंबईत मुसळधार पावसानंतर आता 'हाय टाईड अलर्ट'

**मुंबई :** मुंबईत मुसळधार पावसानंतर आता हाय टाईडचा धोका निर्माण झाला आहे. मुंबईतील मरीन ड्राइव्हवर भरतीच्या लाटा उसळत असून सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. ही परिस्थिती पाहता भारतीय हवामान खात्याने हाय टायड अलर्ट जारी केला आहे.याशिवाय येत्या काही दिवसांत पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तवला आहे. त्यामुळे मुंबईतील समुद्राची पातळी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यावर खंडणीचा आरोप

### FIR दाखल करण्याचे आदेश

वृत्तसंस्था
बंगळुरू

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. बंगळुरूच्या विशेष न्यायालयाकडून अर्थमंत्र्यांविरुद्ध खंडणीच्या आरोपांखाली एफआयआर दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. न्यायालयानं दिलेले हे आदेश इलेक्टोरल बॉँडद्वारे खंडणीच्या आरोपांसंदर्भात देण्यात आला आहे. हा आदेश 42 व्या एसीएमएम कोर्टाने जारी केला आहे.



जनाधिकार संघर्ष संघटनेचे आदर्श अय्यर यांनी निर्मला सीतारामन आणि इतरांविरोधात वैयक्तिक तक्रार दाखल केली होती. पीसीआरमध्ये इलेक्टोरल बॉँडद्वारे खंडणीचा आरोप करण्यात आला होता. यानंतर बेंगळुरूमधील लोकप्रतिनिधींच्या विशेष न्यायालयाने निर्मला सीतारामन यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले. टिळक नगर पोलीस आता निर्मला सीतारामन आणि इतरांविरोधात एफआयआर दाखल करणार आहेत.

केंद्राने 2018 मध्ये निवडणूक रोखे (इलेक्टोरल बॉंड योजना) सुरू केली होती. दरम्यान या योजनेचा उद्देश राजकीय पक्षांना दिलेल्या रोख देणग्या बदलणे हा होता. जेणेकरून राजकीय निधीमध्ये पारदर्शकता सुधारली जावी. राजकीय पक्षांना इलेक्टोरल बॉँड्सच्या माध्यमातून निधी दिला जात होता, मात्र याचा खुलासा करण्यात आला नाही. मात्र, नंतर विरोधकांनी केलेले आरोप आणि याचिका पाहता सर्वोच्च न्यायालयाने ते रद्द केले.



२ वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, रविवार, २९ सप्टेंबर २०२४

# आज रविवारी मध्य व हार्बर रेल्वेवर मेगाब्लॉक

**मुंबई :** मध्य रेल्वे, मुंबई विभागाने विविध अभियांत्रिकी आणि देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी उपनगरीय सेवेवर आज रविवारी मेगाब्लॉक आयोजित केला आहे: माटुंगा ते मुलुंड दरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी ११.०५ पासून ते दुपारी ०३.५५ पर्यंत हा मेगाब्लॉक असणार आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.१४ पासून ते दुपारी ०३.१८ पर्यंत सुटणाऱ्या डाऊन धिम्या मार्गावरील सेवा माटुंगा ते मुलुंड स्थानकांदरम्यान शीव, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप आणि मुलुंड दरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येतील व मुलुंडपुढे डाऊन धिम्या मार्गावर वळवण्यात येईल. सदर सेवा आपल्या गंतव्य स्थानावर नियोजित वेळेपेक्षा १५ मिनिटे विलंबाने चालणार आहे.छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून आज सकाळी १०.३४ ते दुपारी ३.३६ पर्यंत वाशी/बेलापूर/पनवेल करीता सुटणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा आणि पनवेल/बेलापूर/वाशी येथून सकाळी १०.१६ ते दुपारी ३.४७ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस करीता सुटणाऱ्या अप हार्बर मार्गावरील सेवा पूर्णतः रद्द करण्यात येणार आहे.



## थोडक्यात

### आज बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने विद्यार्थ्यांचा सत्कार

**मुंबई:** बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने उद्या रविवारी संध्याकाळी ५.३० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, जेरबाई वाडिया मार्ग, भोईवाडा, परेल, येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बौद्धचायत समिती चे सभापती आनंदराज आंबेडकर हे असणार आहे तर प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. दिक्षा राजेश शिर्क (प्रबोधनकार गायिका भिमराज की बेटी) या उपस्थित राहणार आहेत. त्याच बरोबर प्रमुख वक्ते म्हणून विनोद मोरे (उप सभापती, बौद्धजन पंचायत समिती) लक्ष्मण भगत (कार्याध्यक्ष, बौद्धजन पंचायत समिती) किशोर मोरे (माजी कार्याध्यक्ष तथा विश्वस्त बौ.पं.स. अध्यक्ष बौ.पं.स. पतपेढी लि.) हे सुध्दा उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजेश घाडगे (सरचिटणीस, बौद्धजन पंचायत समिती) हे करणार आहेत.

### जलवाहिनीत पडून महिलेचा मृत्यू : चौकशीचे आदेश

**मुंबई:** मुंबईत बुधवारी सायंकाळी मुसळधार पाऊस पडला त्यावेळी अंधेरी (पूर्व) मधील सीप्झ परिसरात एका महिलेचा पर्जन्य जलवाहिनीत पडून दुर्दैवी मृत्यू ओढवला. या घटनेची सखोल चौकशी करून तीन दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. तसेच त्यासाठी तीन सदस्यांचा समावेश असलेली उच्चस्तरीय चौकशी देखील नियुक्त करण्यात आली आहे. या उच्चस्तरीय चौकशी समितीचे अध्यक्ष म्हणून परिमंडळ ३ चे उप आयुक्त देविदास क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रमुख अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर आणि प्रमुख अभियंता (दक्षता) अविनाश तांबेवाघ हे समितीचे उर्वरित दोन सदस्य आहेत.

### पवन त्रिपाठी सिद्धिविनायक न्यास कोषाध्यक्षपदी

**मुंबई:** श्री. सिद्धिविनायक मंदिर न्यासाच्या कोषाध्यक्षपदी मुंबई भाजपा उपाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांची निवड झाली. या निवडीबद्दल मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते आचार्य पवन त्रिपाठी यांचा काल मुंबई भाजपा कार्यालयात विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी महामंत्री संजय उपाध्याय, आ. राजहंस सिंह, उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष जयप्रकाश सिंह, मुंबई भाजपा सचिव प्रतीक कर्पे, आर. डी. यादव, रमाकांत गुप्ता, वीरेंद्र दुबे, प्रदीप त्रिपाठी, बळवंत वर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## विधानसभा निवडणुकीसाठी शिंदे गट सज्ज

# वसईत राजकीय हालचालींना वेग, शिवसैनिकांना नवी जबाबदारी

प्रतिनिधी
■ वसई

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाने तयारीला जोरदार सुरूवात केली आहे. महाराष्ट्रात भाजपची पकड मजबूत असूनही, शिंदे गट आपले स्वतंत्र अस्तित्व जपत आपले निर्णय घेत आहे. पालघर जिल्ह्यात भाजपला विजय मिळवून देण्यात शिंदे गटाचेही मोठे योगदान होते, आणि आता शिंदे गट वसईसारख्या महत्वाच्या विधानसभा मतदारसंघांवर लक्ष केंद्रित करत आहे.



पालघर जिल्ह्यातील नायगाव भागातील शिवसैनिकांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. जिल्हाप्रमुख निलेश तेंडोलकर यांनी संपर्कप्रमुख रवींद्र फाटक यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसैनिकांना नियुक्त्या दिल्या आहेत. नायगाव पूर्वेकडील परेरा नगर शाखा प्रमुखपदी सुनील फुलचंद सिंह यांची निवड करण्यात आली आहे, तर परेरा नगर कॉलनी विभाग १ आणि २ च्या प्रमुखपदी विकास महेंद्र बनसोडे यांची नियुक्ती झाली आहे. नवरात्रोत्सवानंतर विधानसभा निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महायुतीत अद्याप पालघर जिल्ह्यातील विधानसभा जागावाटप निश्चित झालेले नसल्यामुळे, कोणत्या पक्षाला कोणती जागा मिळणार याबद्दल अनिश्चितता आहे. तरीही, शिंदे गटाने नालासोपारा, बोईसर आणि पालघर या मतदारसंघांवर दावा ठोकला आहे. पूर्वी या मतदारसंघांमध्ये शिवसेनेने निवडणुका लढवल्या असल्याने, शिंदे गट या मतदारसंघांना सोडणार नाही, अशी शक्यता वर्तवली जात आहे.दुसरीकडे भाजपने आपल्या लोकसभा निवडणुकीतील यशाच्या जोरावर नालासोपारा आणि बोईसर या मतदारसंघांवर आपला दावा ठोकण्याची शक्यता आहे. मात्र, शिंदे गट भाजपच्या दबावाला झुकणार नसल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे पालघर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीपूर्वी शिंदे गट आणि भाजपमध्ये जागावाटपावरून संघर्ष होण्याची शक्यता आहे.

# अनधिकृत बांधकामामुळे गटारे तुंबली; नागरिकांवर दुहेरी संकट

## नालासोपारा परिसरात पाणी शिरले; विज पुरवठा खंडीत

प्रतिनिधी
■ वसई

नालासोपारा-समेळपाडा येथील अनधिकृत बांधकामामुळे परिसरातील गटारे तुंबून पाणी शिरल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला आहे. इमारतींच्या आवारात साचलेल्या पाण्यामुळे विज पुरवठा खंडीत करण्यात आला असून, महापालिकेने या प्रकाराची गंभीर दखल घेत संबंधित बिल्डरला दंडाची नोटीस बजावली आहे.

समेळपाडा येथील एका बहुमजली इमारतीच्या बांधकामासाठी गटाराच्या स्लॅबवर मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य टाकण्यात आल्यामुळे गटारे तुंबली आहेत. परिणामी परिसरातील पावसाचे पाणी वाहून न जाता रस्त्यावर व इमारतींमध्ये शिरत आहे. बुधवारी आणि गुरुवारी झालेल्या पावसामुळे पाण्याने विज मीटरमध्ये शिरकाव केल्यामुळे, दुर्घटना टाळण्यासाठी महावितरण कंपनीने काही इमारतींचा विज पुरवठा खंडीत केला.

महापालिकेच्या आरोग्य आणि घनकचरा विभागाने या प्रकरणाची



### बिल्डरला महापालिकेची दंडात्मक नोटीस

दखल घेऊन बिल्डरला पूर्वीच नोटीस बजावली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून बांधकाम सुरूच ठेवले गेले. यामुळे स्थानिक नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी गटारे साफ करण्याची मागणी केली. घनकचरा विभागाचे सहाय्यक आयुक्त सुखदेव दरवेशी यांनी जागेवर येऊन पाहणी केली आणि बिल्डरला एक लाख रुपयांची दंडात्मक नोटीस बजावण्याचे आदेश दिले. नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी, या अनधिकृत इमारतीवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# 15 ऑक्टोंबर.पर्यंत पाऊस : IMD ने मान्सूनच्या माघारीची अधिकृत तारीख जाहीर केली

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय हवामान खात्याने यंदा मान्सून माघारीची अधिकृत घोषणा केली आहे. दक्षिण-पश्चिम मान्सून माघार) IMD नुसार, मान्सून माघारीची नेमकी तारीख 27 सप्टेंबर आहे परंतु यावेळी 15 ऑक्टोबर रोजी मान्सून 17 दिवसांच्या विलंबाने माघार घेईल. IMD ने सांगितले की नैऋत्य मान्सूनची माघार घेण्याची रेषा फिरोजपूर, सिरसा, चुरू, अजमेर, माउंट अबू, दौसा, सुरेंद्रनगर, जुनागढ आणि 21°N/70°E मधून जात आहे.

दक्षिण-पश्चिम मध्य प्रदेशातील चक्रीवादळ आता दक्षिण-पश्चिम उत्तर प्रदेशात आणि आसपास सरकत आहे. -पश्चिम उत्तर प्रदेशात आणि आसपास वसलेले आहे आणि समुद्रसपाटीपासून 5.8 किमी पर्यंत पसरलेले आहे आणि उंचीसह दक्षिण-पश्चिम दिशेकडे झुकलेले आहे. हे कुंड आता दक्षिण गुजरातपासून दक्षिण-पश्चिम उत्तर प्रदेश आणि पश्चिम मध्य प्रदेशातून समुद्रसपाटीपासून 1.5 किमी ते 5.8 किमी उंचीवर असलेल्या चक्रीवादळापर्यंत पसरले आहे. ईशान्य आसाम आणि आसपासच्या भागात समुद्रसपाटीपासून 5.8 किमी पर्यंत चक्रीवादळाचे परिचलन कायम आहे.

वेस्टर्न डिस्टर्बन्स, मध्य-ट्रॉपोस्फेरिक वेस्टर्लीजमधील एक कुंड, ज्याचा अक्ष समुद्रसपाटीपासून 5.8 किमी आहे, आता रेखांश 70°E ते 30°N अक्षांश रेखांशाच्या उत्तरेकडे जातो. शेवटी, 15 ऑक्टोबरला लक्षद्वीपजवळ मान्सून संपण्याची शक्यता आहे.

# मोफत आरोग्य सेवांमुळे आरोग्य विभागाच्या रुग्णालयात 13 कोटी रुग्णांनी घेतले उपचार!

■ मुंबई

महाराष्ट्रात राज्याच्या आरोग्य विभागाने सर्वांना मोफत उपचार देण्याचा निर्णय घेतल्यापासून आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणात रुग्ण उपचारासाठी येऊ लागले आहेत. काही वर्षांपूर्वी आरोग्य विभागाच्या रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात वर्षाकाठी साडेतीन कोटी रुग्णांवर उपचार केले जायचे. मोफत योजनेमुळे हिच संख्या वाढून तब्बल १३ कोटी लोकांनी गेल्या वर्षभरात बाह्यरुग्ण विभागात उपचार घेतले आहे. आरोग्याच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन आरोग्य विभागाने गेल्या काही वर्षात ग्रामीण रुग्णालयांचा विस्तार करण्यास सुरुवात केली आहे. मोठ्या संख्येने ग्रामीण रुग्णालयांमधील खाटांची संख्या वाढवून उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सक्षमीकरण आणि उपकेंद्रांमध्ये वाढ करण्यात आली आहे. आज राज्यात १९ जिल्हा रुग्णालये, ३६४ ग्रामीण रुग्णालये, ९५ उपजिल्हा रुग्णालये, आठ सामान्य रुग्णालये, २० स्त्री रुग्णालये , पाच क्षयरुग्णालये, पाच मनोरुग्णालये, १९१३ प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच जवळपास १८ हजार उपकेंद्रांच्या माध्यमातून गरजू रुग्णांवर मोफत उपचार केले जातात

# पंचवीस कलाकारांच्या कलाकृतींचे लोअर परेल मध्ये प्रदर्शन

प्रतिनिधी
■ मुंबई

बहुप्रतिक्षित "पॉप मीट्स फ्युजन: रीइमॅजिनिंग मॉडर्न कल्चर" प्रदर्शनाचे आयोजन लोअर परेल येथील डिझायनरा पॉप आर्ट गॅलरी, वन लोढा प्लेस, येथे करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी झाले. 25 कलाकारांच्या आकर्षक कलाकृतीं या प्रदर्शनात मांडण्यात आल्या आहेत. या कला कृतींची ओळख उपस्थितांन करून देण्यात आली

उत्साही आणि वैविध्याची आवड असलेले प्रेक्षकांसाठी हे प्रदर्शन



म्हणजे खास आकर्षण आहे. भारतीय लोककला जतन करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या प्रतिकृत कलेक्टिव्ह आणि भारतातील पहिली पॉप आर्ट गॅलरी डिझायनरा यांच्यातील एका महत्त्वाच्या समन्वयाचे हे प्रतीक आहे. या दोन्ही संस्थांनी एकत्र येऊन प्राचीन भारतीय कला आणि परंपरांना आधुनिक पॉप संस्कृतीच्या आकर्षक घटकांशी नव्याने नाळ जोडायला लावणारे एक अनोखे व्यासपीठ तयार केले आहे. 29 सप्टेंबर 2024 पर्यंत सुरू राहणाऱ्या प्रदर्शनाचे आत्ताच सांस्कृतिक क्षेत्राचे महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून गौरव केला जात आहे.

कलाकार प्रतिती देसाई यांनी स्थापन केलेले प्रतिकृत कलेक्टिव्ह प्राचीन भारतीय कला, विशेषतः 7 व्या शतकापासूनची चित्रकला जतन करण्यासाठी काम करते. उद्घाटन सोहळ्याबद्दल बोलताना प्रतिती म्हणाल्या, "प्रदर्शनाच्या उद्घाटनाला मिळालेल्या भरघोस प्रतिसादाने आम्ही खरोखरच भारावून गेलो आहोत. भारतीय वारसा आणि आधुनिक सर्जनशीलता यांच्या संगमासाठी एकत्र आलेल्या वैविध्याची आवड असलेल्या कला क्षेत्रातील रसिकांची इथे असलेली उपस्थिती पाहणे हे खूप समाधानकारक आहे. कला म्हणजे भूतकाळ आणि वर्तमान यांच्यातील एक भक्कम दुवा आहे आणि कलेमुळेच नवीन संवाद आणि नाती निर्माण होतात, याचे ही रात्र म्हणजे एक प्रतिक आहे."

# सातही तलावात पुढील 373 दिवस पुरेल इतके पाणी जमा

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईला पाणी पुरवठा करणा-या तलाव क्षेत्रात यंदा समाधानकारक पाऊस पडल्याने सातही तलावांत पाणीसाठा वाढला आहे. शुक्रवारी सकाळी सहा वाजेपर्यंत १४,३८,३९९ दशलक्ष लिटर (९९.३८ टक्के) इतका पाणीसाठा जमा झाला आहे. हा पाणीसाठा पुढील ३७३ दिवस पुरेल इतका आहे. मुंबईला पुढील वर्षभरासाठी सुरळीत पाणीपुरवठा होण्याकरीता १४,४७,३६३ दशलक्ष लिटर इतका (३७५ दिवस) पाणीसाठा असणे आवश्यक असते. तलावांत पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्याने यंदा मुंबईकरांना पाणी कपातीच्या संकटाला सामोरे जावे लागणार नसल्याची स्थिती असल्याने मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.



मुंबईला अप्पर वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्यवैतरणा, भातसा, विहार, तुलसी या सात तलावांतून मुंबईला रोज ३८५० दशलक्ष पाणी पुरवठा केला जातो. यंदा जून महिन्यात पावसाने पाठ फिरवल्याने सात तलावांनी तळ गाठला होता. त्यामुळे पालिकेने १० टक्के पाणी कपात लागू केली. मात्र जुलैच्या दुस-या आठवड्यात तलावक्षेत्रात जोरदार पाऊस बरसल्याने या एका महिन्यांत सातपैकी पाच तलावे भरून वाहू लागली.

तलावांत समाधानकारक पाऊस पडल्याने पालिकेने पाणी कपात रद्द केली. त्यामुळे मुंबईकरांना दिलासा मिळाला. सर्वात जास्त पाणीसाठा असलेला भातसा तलाव आणि अप्पर वैतरणा हे दोन तलाव भरायचे अजून बाकी आहे. मात्र समाधानाची बाब म्हणजे सध्या भातसा तलावात ९८.९७ टक्के तर अप्पर वैतरणा तलावात ९९.३६ टक्के इतका पाणीसाठा जमा आहे. त्यामुळे हे दोन्ही तलाव जवळपास ९९ टक्के भरले आहेत.

सध्या परतीचा पाऊस समाधानकारक बरसतो आहे. येत्या काही दिवसांत चांगला पाऊस झाल्यास ही तलावेही भरण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईकरांची वर्षभराची तहान भागणार असल्याने पाणी कपातीला मुंबईकरांना सामोरे जावे लागणार नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**सात तलावातील पाणीसाठा स्थिती (२७ सप्टेंबर पर्यंत)**

| तलाव | पाणीसाठा (द. लक्ष लि. मध्ये) |
|---|---|
| अप्पर वैतरणा | २२६०८३ |
| मोडक सागर | १२८९२५ |
| तानसा | १४४२४० |
| मध्या वैतरणा | १९१५८२ |
| भातसा | ७११८२४ |
| विहार | २७६९८ |
| तुळशी | ८०४६ |
| **तीन वर्षातील स्थिती** | |
| सन २०२४ | १४,३८,३९९ (९९.३८ ) |
| सन २०२३ | १४,४२,३९४ (९९.६५) |
| सन २०२२ | १४२९३९३ (९८.७५) |

# विधानसभा निवडणुकीत एकाच टप्प्यात मतदान घेण्यात यावे: शिवसेनेची आयोगाकडे मागणी

## माजी खासदार राहुल शेवाळे यांनी दिली माहिती

■ मुंबई

"आगामी विधानसभा निवडणुकिसाठी राज्यभरात एकाच टप्प्यात मतदान घेण्यात यावे. काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्रांवरील अपुऱ्या सुविधेमुळे मतदारांनी नाराजी व्यक्त केली होती. यंदा विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आणि मतदारांना कोणत्याही असुविधेविना विनाव्यत्याय मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी निवडणूक आयोगाने सर्व आवश्यक सुविधांनी युक्त अशी सुसज्ज मतदान केंद्रे उभारावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने आयोगाकडे करण्यात आली.

महाराष्ट्राच्या दोन दिवसीय दौऱ्यावर असलेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पथकासोबत झालेल्या बैठकीनंतर माजी खासदार राहुल शेवाळे यांनी सांगितले.तसेच ज्येष्ठ नागरिक मतदारांची वयोमर्यादा 85 वरून पुन्हा 80 वर्षे करावी जेणेकरून 80 वर्षांवरील जेष्ठ नागरिकांना घरून मतदान करण्याची सुविधा मिळू शकेल.

निवडणूक खर्चाची मर्यादा 20 लाखांनी वाढवावी तसेच निवडणूक खर्चाच्या दरपत्रकातील दर निश्चित करताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरपत्रकाला आधारभूत न मानता बाजारभावाने या दरपत्रकातील किमती ठरवल्या जाव्यात. होर्डिंग लावण्यासाठी जे कर आकारले जातात ते राज्यभरात समान ठेवावेत. यांसह विविध सूचना केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पथकासोबत झालेल्या बैठकीत शिवसेनेच्या वतीने करण्यात आल्या.असेही राहुल शेवाळे, यांनी सांगितले.

# 'फुले आंबेडकरी वाङ:मयकोशाचे' सोमवारी प्रकाशन

## 560 दलित साहित्यिकांचा तब्बल 1428 पानांच्या या कोशात आढावा

प्रतिनिधी
■ मुंबई

'फुले आंबेडकरी वाङ:मयकोश' या दलित साहित्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या कोशग्रंथाचे प्रकाशन सोमवारी मुंबईत प्रख्यात विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते होणार आहे. मुंबई प्रेस क्लब मध्ये सायंकाळी 5.30 वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रख्यात साहित्यिक अर्जुन डांगळे राहतील. प्रसिद्ध समिक्षक डॉ. अनंत देशमुख आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मिनाक्षी पाटील या कोशग्रंथाबद्दल बोलणार आहेत.

१९६० च्या दरम्यान उदयाला आलेल्या दलित साहित्याने सहा साडे सहा दशकांचा कालखंड पूर्ण केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ, त्यांनी सुरु केलेली वृत्तपत्रे, त्या वृत्तपत्रांतून प्रकाशित झालेले साहित्य, आंबेडकरी जलसे, आंबेडकरी लोकगीते आणि दलित साहित्य व या साहित्याचा झालेला विकास ही या देशातील ऐतिहासिक घटना आहे. याला महात्मा फुल्यांपासूनचा वारसा आहे. त्यांचे एकूण साहित्य आणि समाजकार्याने ही समग्र चळवळ प्रभावित आणि समृद्ध झालेली आहे. हा इतिहास समाजाला, विद्यार्थी, संशोधक आणि अभ्यासकांना अवगत व्हावा यासाठी "फुले आंबेडकरी वाङमय कोश" निर्माण करण्यात आला आहे. तब्बल 1428 पानांच्या या कोशात आंबेडकरपूर्व, आंबेडकरकालीन आणि आंबेडकरोत्तर अशा तिन्ही कालखंडातील सुमारे 560 लेखक, त्यांचे साहित्यातील योगदान व साहित्याचे महत्व अधोरेखित करण्यात आले आहे.

प्रसिद्ध दलित साहित्यिक डॉ. महेंद्र भवरे हे या ग्रंथाचे मुख्य संपादक असून सर्वश्री. डॉ. अशोक इंगळे, राम दोतोंडे, डॉ. सुनील अवचार, डॉ. मच्छिंद्र चोरमारे, डॉ. अशोक नारनवरे, डॉ. प्रकाश मोगले, डॉ. भास्कर पाटील, पंडित कांबळे, डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांच्या संपादक मंडळाने हा ग्रंथ सिध्द केलेला आहे. कोश वाङःमय प्रसिद्ध करण्याचा लौकिक असलेल्या पुण्याच्या डायमंड प्रकाशनाने हा कोश प्रसिद्ध केला आहे. हा त्यांचा 37 वा कोशग्रंथ आहे.

## बांग्ला देशात बौद्ध, हिंदू ,ख्रिचन समाजावर होतोय अन्याय

# अल्पसंख्यांकांवर होत असलेले अत्याचार रोखण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करावे - ऑल इंडिया भिक्खु संघाची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

भिक्खू संघ मुंबई व चकमा असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने बांगलादेशामध्ये बौद्ध ख्रिश्चन व हिंदू समुदायावर होत असलेल्या अत्याचाराच्या घटनांचा जाहीर निषेध करण्यासाठी मुंबईतील आझाद मैदान येथे भिक्खू संघाच्या वतीने शुक्रवारी धरणे आंदोलन करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातून चकमा असोसिएशनचे व भिक्खू संघाचे सर्व भदंत मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी भदंत शांतीरत्न यांनी भ्याड हल्ल्याचा निषेध करताना म्हटले की, बांगलादेशातील बौद्ध, ख्रिश्चन, हिंदू सुरक्षित नाही, बांगलादेशातील सरकार हल्ले थांबवण्यासाठी अपयशी ठरलेले आहे. त्यामुळे बांगलादेशातील तत्कालीन सरकारने बौद्ध ख्रिश्चन व हिंदू समाजाची जाहीर माफी मागावी अशी मागणी केली. तसेच भारत सरकारने यामध्ये तातडीने लक्ष घालून अल्पसंख्यांवर होत असलेले अत्याचार रोखण्यासाठी विशेष प्रयत्न करावे अशी मागणी करण्यात आली.

यावेळी मुंबईतून व महाराष्ट्रातून भंतेजी, उपासक रविभाऊ गरूड , नितीनभाऊ मोरे, समाजभूषण बौद्धाचार्य सो ना कांबळे गुरूजी, ज्ञानमित्र घनश्याम चिरणकर ,आदि, उपासक, उपासिका मोठ्या संख्येने या निषेध धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 99**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ९९**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

३ वृत्तमानस
मुंबई
मुंबई, रविवार, २९ सप्टेंबर २०२४

## मुंबईमध्ये ग्लोबोइल इंडिया 2024 ची 27 वी आवृत्ती संपन्न

**मुंबई :** ग्लोबॉइल इंडियाच्या 27 व्या आवृत्तीचा भव्य कार्यक्रम वेस्टिन पवई तलाव, मुंबई येथे यशस्वीरित्या संपन्न झाला. टेफलाझने आयोजित केलेला हा कार्यक्रम जागतिक खाद्यतेल आणि कृषी-व्यवसाय क्षेत्रातील सर्वात प्रमुख कार्यक्रमांपैकी एक आहे. या कार्यक्रमात 60 हून अधिक देशांतील 1,500 हून अधिक प्रतिनिधी, 100 प्रदर्शक आणि असंख्य उद्योग तज्ञ उपस्थित होते. या वर्षाची मुख्य थीम होती "खाद्य तेलांचे भविष्य: इनोव्हेशन, सस्टेनेबिलिटी आणि मार्केट डायनॅमिक्स", ज्या अंतर्गत अनेक महत्त्वाच्या चर्चा झाल्या. इव्हेंटमुळे ज्ञानाची देवाणघेवाण, नेटवर्किंग आणि महत्त्वाच्या व्यवसाय सौद्यांना अंतिम रूप देण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून काम केले. कार्यक्रमादरम्यान $500 दशलक्ष पेक्षा जास्त किमतीचे सौदे बंद झाले. जागतिक पुरवठा साखळी, शाश्वतता आणि खाद्यतेलाच्या बाजारपेठेतील नवकल्पना यासारख्या गंभीर मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी या कार्यक्रमाने उद्योग नेते, धोरण निर्माते आणि तांत्रिक तज्ञ सहभागी झाले होते. या कार्यक्रमाला थॉमस मायलके, कार्यकारी संचालक, OIL वर्ल्ड, दोराब मिस्त्री, गोदरेज इंटरनॅशनल लिमिटेड आणि पतंजली फूड्स लिमिटेडचे सीईओ संजय अस्थाना यांच्यासह अनेक प्रभावशाली वक्ते उपस्थित होते.



## बेलासिस पुलाच्या पुनर्बांधकामासाठी पालिका खर्च करणार 100 कोटी रुपये



**असे होणार प्रकल्पाचे काम**

- पुलाची लांबी- पूर्वेस १३८.३९ मीटर.पश्चिमेस- १५७.६८१ मीटर. पुलाची रुंदी- २० मीटर.
- गाळ्यांची (स्पॅन) संख्या- पूर्वेस ५, पश्चिमेला ५, एकूण १०. स्पॅनची एकूण लांबी- २० मीटर.
- पाया बांधकाम- आरसीसी पाईल्स अधिक पाईल कॅप. बांधकामाचा प्रकार- स्टील गर्डर आणि आरसीसी डेक स्लॅब.

**पोहोच रस्त्याचे निष्कासन व पुनर्बांधणीचा खर्च**

कंत्राट खर्च- ६३ कोटी १० लाख ५२ हजार रुपये.एकूण कंत्राट- ८१ कोटी १६ लाख ५९ हजार रुपये. अन्य कर, सल्लागार आदीसह अंदाजित खर्च-९९ कोटी ७८ लाख ३० हजार रुपये.

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक आणि ग्रँट रोड रेल्वे स्थानक यांच्यामधील बेलासिस पुलाचा सध्याचा पोहोच रस्ता निष्कासित करून पुलाचे पुनर्बांधकाम केले जाणार आहे. पालिका यासाठी एकूण ९९ कोटी ७८ लाख ३० हजार रुपये खर्च करणार आहे. या कामाला मंजुरी देण्याची प्रक्रिया मुंबई महापालिकडून सुरू करण्यात आली आहे.

पश्चिम रेल्वे मार्गावरील पुलांचे आयुर्मान लक्षात घेता पालिकेशी संबंधित पुलांच्या पुनर्बांधणीचे काम महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एमआरआयडीसीएल) कडे सोपविण्यात आले होते. मध्यंतरी पश्चिम रेल्वे प्राधिकरणाने तातडीची बाब म्हणून ग्रँट रोड आणि चर्नी रोड रेल्वे स्थानकांदरम्यानच्या फेरेरे पुलाचे रिगर्डरिंग म्हणजेच तुळयांची पुनर्स्थापना तसेच पोहोच रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम हाती घेतले. त्यानंतर नोव्हेंबर २०२१ मध्ये हा पूल वाहतुकीस खुला करण्यात आला. रेल्वे पुलांच्या रिगर्डरिंगची प्राथमिक तपासणी आणि व्यवहार्यता अहवाल देण्यासाठी पालिकेने व्हीजेटीआय या संस्थेची नियुक्ती केली होती. बेलासिस पुलाच्या रिगर्डरिंगचे काम फेरेरे पुलाच्या धर्तीवर करता येईल, असा अहवाल या संस्थेने दिला होता. त्यानुसार हे काम करण्यासाठी एमआरआयडीसीएल कंपनीला कळविण्यात आले. या कंपनीने त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर बेलासिस पुलाच्या पुनर्बांधणीचे काम करण्याची तयारी पश्चिम रेल्वेने दाखविली. त्याला संबंधित प्राधिकरणांनी मंजुरीही दिली होती.

पश्चिम रेल्वे प्रशासनाने बेलासिस पुलाच्या पोहोच रस्त्याच्या मजबुतीकरणाची व्यवहार्यता तपासली असता या कामासाठी बाजूला जागा उपलब्ध नसल्याचे दिसून आले. अशी जागा मिळविण्यासाठीचा संभाव्य अवधी आणि वेळ लक्षात घेता हा पूल आहे तेथेच पुनर्बांधणी करण्याचा पर्याय पुढे आला. पुलाच्या रेल्वे हद्दीतील भागाची पुनर्बांधणी रेल्वे प्राधिकरणाने, तर पालिकेच्या हद्दीतील पोहोच रस्त्याची पुनर्बांधणी पालिकेच्या पूल खात्याकडून करण्याचा निर्णय झाला. पालिकेच्या हद्दीतील कामासाठी टीपीएफ या सल्लागार कंपनीने ७२ कोटी २१ लाख ९३ हजार रुपये खर्चाचे कार्यालयीन अंदाजपत्रक तयार केले होते. या कामासाठी निविदा मागवल्या असता पिनाकी इंजिनिअर्स अँड डेव्हलपर्सची उणे १२.६२ टक्के दराची निविदा लघुत्तम ठरली. त्याशिवाय वितराग इन्फ्राची उणे २१.२८ टक्के, साई प्रोजेक्टसची उणे १२.१० टक्के आणि मंगलम बिल्डकॉनची उणे २.७० टक्के दराची निविदाही पालिकेकडे आली होती. त्यापैकी पिनाकीची निविदा मंजुर करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

या कामासाठी महापालिकेला कार्यालयीन अंदाजापेक्षा उणे १२.६२ टक्के इतक्या लघुत्तम दराची निविदा प्राप्त झाल्याने मंजुरीसाठी तिची शिफारस करण्यात आली आहे. शिवाय या कामासाठी तांत्रिक सल्लागाराला एक कोटी सात लाख ९६ हजार रुपये दिले जाणार आहेत. याबाबतचा प्रस्ताव स्थायी तसेच सुधार समितीच्या म्हणजेच प्रशासकांच्या मंजुरीच्या प्रक्रियेत असल्याचे सांगण्यात आले.

## मुंबईत दहशतवादी हल्ल्याची भीती; पोलीस अलर्ट मोडवर, गर्दीच्या ठिकाणी वाढवली गस्त

प्रतिनिधी
■ मुंबई

दहशतवाद्यांकडून मुंबईला धोका असल्याची माहिती सेंट्रल एजन्सीनं मुंबई पोलिसांना दिली आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई पोलीस सतर्क झाल्याचं पाहायला मिळतंय. दहशतवाद्यांकडून मुंबईला धोका असल्याच्या माहितीनंतर मुंबई पोलीस अलर्ट मोडवर असून गर्दीची ठिकाणं आणि धार्मिक स्थळांवर मुंबई पोलिसांकडून नजर ठेवली जात आहे. शहरात तगडी सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.



**क्रॉफर्ड मार्केट परिसरात पोलिसांचे मॉक ड्रिल**

*केंद्रीय गुप्तचर यंत्रणांनी मुंबईला संभाव्य दहशतवादी हल्ल्याचा धोका असल्यानं अलर्ट करण्यात आलं आहे. शहरातील गजबजलेलं ठिकाण असलेल्या क्रॉफर्ड मार्केट परिसरात पोलिसांचं मॉक ड्रिल करण्यात आलं आहे. यावेळी पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं की, "दहशतवादी धोक्याचा इशारा मिळाल्यानं नागरिकांनी सतर्क राहावं. आगामी विधानसभा निवडणूक असल्यानं देखील सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात येत आहे."*

मुंबईला दहशतवादी हल्ल्याचा धोका असल्याची माहिती केंद्रीय गुप्तचर यंत्रणांना मिळाली. त्यामुळे केंद्रीय गुप्तचर यंत्रणेनं मुंबई पोलिसांना सतर्क राहण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. मुंबई पोलिसांनी शहरात तगडी सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. शहरातील गर्दीची धार्मीक स्थळं आणि गर्दीच्या ठिकाणांवर पोलीस जवानांना तैनात करण्यात आलं आहे. शहरातील गर्दीच्या ठिकाणांची झाडाझडती घेतली जात आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस अधिकाऱ्यांकडून मॉकड्रील घेण्यात येत आहे.

मुंबई शहरातील विविध पोलीस ठाण्यातील पोलीस उपायुक्तांना अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळं पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी गस्तीवर आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून काही संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यास ती तत्काळ पोलीस मुख्यालयाला कळवण्यात यावी, असे आदेश देण्यात आले आहेत. तसंच शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलाय.

## 'मायबीएमसी सचेत' ॲप्लिकेशनद्वारे कळणार क्षेत्रीय कामकाजांची वास्तविक स्थिती

**सध्या प्रायोगिक तत्वावर ॲप्लिकेशनची सुरुवात, १ ऑक्टोबर २०२४ पासून पूर्णवेळ उपलब्ध**

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील विविध प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावरील परिरक्षण (मेंटेनन्स), घनकचरा व्यवस्थापन, इमारती आणि कारखाना विभागाच्या संबंधित कामकाजाचे संनियंत्रण आणि त्यात सुलभता आणण्याच्या उद्देशाने क्षेत्रीय कामकाजांची (फिल्ड वर्क) वास्तविक स्थिती जाणून घेण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मायबीएमएसी सचेत ॲप्लिकेशन (MyBMC Sachet app) तयार करण्यात आले आहे. सध्या हे मोबाईल ॲप्लिकेशन प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आले आहे. येत्या १ ऑक्टोबर २०२४ पासून ते संबंधित कर्मचाऱ्यांसाठी पूर्णवेळ उपलब्ध असेल.

पालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने भौगोलिक माहिती तंत्रज्ञानावर (जीआयएस) आधारित मायबीएमसी सचेत ॲप्लिकेशनची निर्मिती केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांतील कर्मचारी, अधिकारी नियमितपणे क्षेत्रीय कामकाज (फिल्ड वर्क) करत असतात. त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या कामकाजामधील पारदर्शकता, विश्वसनीयता आणि क्षेत्रीय कामकाजाच्या व्यवस्थापनात सुधारणा व्हावी, या उद्देशाने मायबीएमएसी सचेत ॲप्लिकेशन (MyBMC Sachet app) तयार करण्यात आले आहे.

सध्या हे मोबाईल ॲप्लिकेशन अँड्रॉईड प्लॅटफॉर्मवर आणि प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आले आहे. लवकरच हे ॲप्लिकेशन आयओएस प्लॅटफॉर्मवरही उपलब्ध केले जाणार आहे. १ ऑक्टोबर २०२४ पासून ते संबंधित कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी पूर्णवेळ उपलब्ध होईल, असे महानगरपालिका प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

## कांदिवलीत लोखंडवाला ते ठाकूरगाव 120 फूट डीपी रोडवरून भाजप - शिवसेनेत उफाळला वाद

प्रतिनिधी
■ मुंबई

कांदिवली लोखंडवाला ते ठाकूर गाव १२० फूट डीपी रस्त्याबाबत वाद सुरूच आहे. काल भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी डीपी रोडवरून मधला मार्ग काढण्यासाठी आंदोलन केले होते. दुसरीकडे डीपी रोडला मध्यम मार्ग काढण्यास शिवसेनेच्या(शिंदे गट) कार्यकर्त्यांनी विरोध केला.

मात्र भाजपचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी या प्रकरणावरून मागाठाणेचे शिवसेनेचे आमदार प्रकाश सुर्वे यांचा समाचार घेतला. ते म्हणाले की, प्रकाश सुर्वे यांना वाटते की, ते डीपी रोडचे अलाइनमेंट बदलतील, पण ते इतके सोपे नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी पुढे येऊन संरेखन बदलता येईल असे सांगितले तर ते मी स्वतः जनतेला समजावून सांगेन. आमदार अतुल भातखळकर यांच्या विरोधात काही लोकांनी केलेली घोषणाबाजी मला आवडली नाही. आता गोष्टी बिघडत चालल्या आहेत. भातखळकर यांना डीपी रोड पूर्वीच खुला करता आला असता, राज्यातील जनतेला न्याय मिळावा म्हणून ते शांत होते. मात्र यावर आता निर्णय व्हायला हवा. असेही गोपाळ शेट्टी म्हणाले.

शेट्टी यांनी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्यावरही निशाणा साधला आहे. येणाऱ्या काळात गगराणी बदनाम होणार असून, त्यांना उत्तर देणे कठीण होणार आहे, तेही अडकू शकतत, असेही ते म्हणाले.

## बॅकबे रिक्लेमेशन स्कीम सुधारित विकास योजना मसुदा कायमचा रद्दबातल करा!

**मच्छिमार संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) १५८ व्या बैठकीत बॅकबे रिक्लेमेशन स्कीम (ब्लॉक III ते VI) साठी सुधारित मसुदा विकास आराखडा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ह्यांना सादर करण्यात आला आहे. ह्या सुधारणेमध्ये इतर सरकारी आणि गैर-सरकारी संस्थांद्वारे सुरू असलेल्या प्रकल्प तसेच झोपडपट्टी पुनर्वसन आणि मेट्रो प्रकल्पांसह क्षेत्र विकास योजना पुनरावृत्ती करण्याची परवानगी देण्यात आल्याने स्थानिक भूमिपुत्र मच्छिमारांना आपल्या व्यवसायाच्या भविष्याबबत भीती निर्माण झाली आहे. म्हणून मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाचा विरोधात मच्छिमार संघटनेनी भूमिका घेतली असल्याची माहिती अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल यांनी दिली.जर ह्या विकास आरखड्यामुळे एकही कोळी बांधव बेघर होणार असेल तर ह्या सरकारला आणि प्राधिकरणाला जसाच तसे उत्तर देण्यात येईल आणि हा प्रस्तावित विकास आराखड्याच्या विरोधात मच्छिमार समाज रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही.असा इशाराही देवेंद्र तांडेल यांनी दिला आहे.

मच्छिमार समितीकडून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बुधवारी ईमेल द्वारे हा अपरिपक्व आणि बिल्डर लोबीच्या हिताचा विकास आराखडा रद्दबातल करण्याची मागणी करण्यात आली आहे. कोस्टल रोडमुळे मासेमारी संकटात येणार असल्याची भीती मच्छिमारांकडून व्यक्त होत असल्याने सदर मसुद्यात चित्रित केलेल्या समुद्रातील कोस्टल रोड हा समुद्रात पूल स्वरूपात उभारणार अथवा संपूर्ण मार्गिका नरिमन पॉईंट ते गीता नगर पर्यंत समुद्रात भराव टाकून उभारणी करण्यात येणार आहे किंवा नाही ह्याचा खुलासा करण्याचे आवाहन प्राधिकरणाला करण्यात आले आहे. तसेच हायवेची व्याख्या एका महानगरपालिकेला दुसऱ्या महानगर पालिकेशी जोडणारा रस्ता म्हणजे हायवे असे असून सदर रेखांकित रस्त्याला हायवे संबोधून सदर रस्ते किती महत्वाचे आहे हा समज जनतेच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न MMRDA प्राधिकरणाकडून होत असून ही जनतेची फसवणूक असल्याचा आरोप तांडेल यांनी केला आहे.

सदर विकास आराखड्या अंतर्गत निरनिराळे प्रस्तावित प्रकल्प कुठल्या संस्थेच्या मागणीमुळे अथवा कुठले निकष लावून हा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे याचा खुलासा समितीने प्राधिकरणाकडून मागितला आहे. विकासकांच्या (बिल्डर लॉबी) हितासाठी हा आटापिटा सुरु असल्याचा आरोपही मच्छिमार समितीकडून निवेदनात करण्यात आला आहे. ह्या संपूर्ण प्रकल्पात सी.आर.झेड कायद्याचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होणार असल्याने समुद्रातील जैविविधता लक्षात न घेता बनविण्यात आलेल्या मसुद्याला मच्छिमार समाजाकडून विरोध दर्शविण्याात आला आहे.

भूखंड क्रमांक १०६ ते १०९ ह्या भूखंडावर कोळी बांधव मोठ्या संख्येने राहत असून सदर भूखंडावरील कोळी बांधवांचे भवितव्य उध्वस्त करणारा मसुदा MMRDA प्राधिकरणाकडून निर्माण करण्यात आला आहे तसेच भूखंड क्रमांक १४३ हा भूखंड मच्छिमार वसाहत म्हणून राखीव असून ह्या भूखंडावर मच्छिमार आपल्या मासेमारी बोटींची डागडुजी करीत असतात आणि ह्या भूखंडावर नवीन आराखड्यामध्ये "food kiosk" म्हणून राखीव दर्शविण्यात आले असून हा भूखंड मच्छिमारांच्या नावे करण्यासाठी जिल्हाधिकारी मुंबई शहर ह्यांच्या कार्यालयातून प्रस्तावना करण्यात आल्याने ह्या भूखंडावर MMRDA प्राधिकरणाकडून अतिक्रमण होत असल्याचा दावा तांडेल यांनी केला आहे.

समुद्रात मच्छिमार अनेक वर्षांपासून आपली उपजीविका परंपरागत पध्दतीने करीत असल्याने समुद्राखालच्या जागेवर मच्छिमारांना परंपरागत अधिकार "द इंडियन इसमेन्ट ॲक्ट १८८२" मधील ह्या कायद्याने दिले असून समुद्रात कुठलाही प्रकल्प करण्याआधी मच्छिमार समाजाबरोबर संवाद साधल्याशिवाय प्रकल्प करणे ही कायद्याची पायमल्ली करण्यासारखे आहे. तसेच समुद्रात खाजगी बोटींना नांगरण्यासाठी प्रयोजन करण्यात आले आहे. हे प्रयोजन मच्छिमारांना आपल्या उप जिविकेपासून वंचित ठेवण्यात येत असल्याने भारतीय संविधानाच्या परिशिष्ट २१ चे उल्लंघन MMRDA करीत असल्याने हा प्रकल्प रद्दबातल करण्याची मागणी मच्छिमारांकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## पालिकेच्या करनिर्धारण व संकलन' खात्यातील 'निरीक्षक' संवर्गाची रिक्त पदे खात्यांतर्गत भरा

**म्युनिसिपल कर्मचारी सेनेची मागणी**

प्रतिनिधी
■ मुंबई

खात्यांतर्गत कर्मचा-यांवरील अन्याय निवारणाबाबत न्यायीक दाव्याचा निकाल प्रलंबित असल्याने 'निरीक्षक' पदांच्या बाह्य -भरतीचे प्रयोजन स्थगित करून, करनिर्धारण व संकलन खात्यातील 'निरिक्षक' संवर्गाची रिक्त पदे खात्यांतर्गत उत्तीर्ण ऊमेदवारांमधुनच भरावीत अशी मागणी 'म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेने' चे अध्यक्ष बाबा कदम व उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे-बापेरकर यांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे.

दि. 22-07-2016 रोजीच्या क्रमांक- कवसं/001/आस्था अन्वये अंतर्गत भरतीबाबतच्या जारी परिपत्रकानुसार 'करनिर्धारक व संकलक ' खात्यातील विभाग निरीक्षक /कनिष्ठ सर्वेक्षक / जकात निरीक्षक संवर्गातील 218 रिक्त पदांसाठी लेखी परिक्षा घेण्यात आली होती. त्यामध्ये एकूण 236 उमेदवार उत्तीर्ण झाले. मात्र केवळ 170 गुणवत्ताधारक (Merit) उमेदवारांची नियुक्तीसाठी यादी प्रसारीत करण्यात आली. यापैकी केवळ 154 उमेदवार उपलब्ध झाले त्यांना तदर्थ तत्वावर नियुक्ती दिली गेली. मात्र 16 रिक्त पदे, परिपत्रकानुसार प्रतिक्षा यादीतून भरावयाची होती त्याचा निर्णय 'करनिर्धारण व संकलन' खात्याने अद्याप घेतलाच नाही. या अन्यायाबाबतची तक्रार आयुक्त यांना 20 डिसेंबर 2016 रोजी करण्यात आली होती. असे नमूद करून या 154 तदर्थ तत्वावरील निरिक्षकांपैकी कालांतराने 45 निरीक्षकांनी मूळ खात्यात व आधीच्या मूळ पदावर प्रत्यावर्तीत(Revert) होणे पसंद केले. उर्वरीत 109 तदर्थ तत्वावरील निरीक्षक व सदर भरती कायम ठेवण्याबाबतचा सुमारे तीन वर्षे चाललेला न्यायालयीन लढा मागे घेण्याच्या अटीसापेक्ष एकूण 81 निरीक्षकांना तदर्थ तत्वावरुन नियमीत करण्यात आले व अन्य27 जणांना जसजशी पदे रिक्त होतील त्याप्रमाणे नियमीत करण्यात येईल असा पालिका प्रशासनाने निर्णय घेतला. परंतु या प्रकरणातील प्रतिक्षा सूचीवरील दुर्लक्षीत 55 उत्तीर्ण उमेदवारांना निरीक्षक पदावर सामावून घेण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली नाही.

सदर प्रकरण "राष्ट्रीय अनुसुचीत जाती आयोग", नवी दिल्ली यांच्या न्यायकक्षेत असल्याने निदान सुनावणी होऊन निकाल लागेपर्यंततरी बाह्य भरतीबाबतचा निर्णय घेऊ नये अथवा त्यांस मंजूरी देण्यात येऊ नये अशी विनंती संघटनेने केली असुन, आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे चर्चेसाठी वेळ मागितली आहे.

## 300 कोटी नुकसान करणारी लोअर परळची 520 कोटींची नवीन कार पार्किंग

■ मुंबई

एलेव्हेटेड मल्टीलेव्हल इलेक्ट्रोमेकॅनिकल कार पार्किंग सिस्टीम (शटल आणि रोबो पार्कर सिस्टीम) माटुंगा, मुंबादेवी, फोर्ट आणि वरळी अंतर्गत यापूर्वी झालेले नुकसान लक्षात न घेता पुन्हा जी दक्षिण लोअर परळ येथील अस्फाल्ट प्लांट येथे 548 कार पार्किंगचे 520 कोटींचे जारी केलेली निविदा रद्द करत कंत्राटदार आणि अधिकारी यांचे संगनमत लक्षात घेता कारवाई करण्याची मागणी आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे. 300 कोटी नुकसान करणारी लोअर परळची 520 कोटींची नवीन कार पार्किंग असणार आहे.

अनिल गलगली यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालिका आयुक्त भूषण गगराणी यांस पाठविलेल्या पत्रात उल्लेख केला आहे की यापूर्वी करण्यात आलेल्या तक्रारीची कोणतीही दखल न घेता अधिकारी वर्गाने जी दक्षिण लोअर परळ येथील अस्फाल्ट प्लांट येथे 548 कार पार्किंगचे 520 कोटींचे नवीन निविदा जारी केल्या आहेत. प्रत्येक कार मागे 95 लाख खर्च येत आहे. यामुळे या निविदेत 300 कोटींचे नुकसान होईल. या निविदेतही मूळ उपकरणे उत्पादन भागीदार सर्व निविदाकारात एकच म्हणजे मेसर्स सोटेफिन पार्किंग प्रायव्हेट लिमिटेड असेल यात काडीमात्राची शंका नसेल.

यापूर्वी पालिकेने कार्यादेश दिले आहेत त्यात माटुंगा, फ्लोरा फाउंटन आणि वरळी येथील पार्किंगचा समावेश आहे. फ्लोरा फाउंटन ( विशाल कंन्स्ट्रकॅशन ) येथे 70 कोटीत 176 कार पार्किंगचे कंत्राट देण्यात आले आहे. प्रति कार हा खर्च 39.77 लाख आहे. वरळी ( श्री इंटरप्रायझेस ) येथे 640 कार पार्किंगचे काम 216.94 कोटीत देण्यात आले असून प्रति कार हा खर्च 33.90 लाख आहे तर माटुंगा ( रेलकोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट) येथे 475 कार पार्किंगचे काम 103.87 कोटीत देण्यात आले असून प्रति कार हा खर्च 21.87 लाख आहे. त्याचशिवाय एमएमआरडीएच्या मालवणी येथे 669 कार पार्किंगचे काम 150 कोटीत देण्यात आले असून तेथे हा खर्च प्रति कार 22.42 लाख इतका आहे.

## टिळकनगरमध्ये हक्काच्या घरासाठी नवीन सदनिकाधारकांचा अन्यायाविरुद्ध उठला आवाज

**इमारत क्र. १८ च्या सदनिकाधारकांनी बिल्डर आणि सोसायटीच्या विरोधात पुकारले निषेध आंदोलन**

प्रतिनिधी
■ मुंबई

टिळक नगर चेंबूर येथील टिळक नगर सहयोग सहकारी गृहनिर्माण सोसायटीतील नवीन सदनिका खरेदी केलेल्या सदस्यांनी शुक्रवारी संध्याकाळी निषेध आंदोलन पुकारून नवीन सदनिकाधारकांवर वरद वास्तू बिल्डर आणि सोसायटीकडून होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवला आहे. पुनरविकासात इमारत बांधून पूर्ण करण्यासाठी विकासक नव्या सदनिका धारकांना अतिरिक्त घर विक्री करून पैसा उभारत असतो अशात ज्या लोकांनी कर्जाने घर घेतली त्यांना रीडेव्हलपमेंट मध्ये घर मिळत नाहीत अशीच परिस्थिती टिळक नगरच्या इमारत क्रमांक 18 मधील नवीन सदनिका धरकांवर आल्यामुळे या सदनिकाधारकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ आली.



टिळक नगर सहयोग सहकारी गृहनिर्माण सोसायटी इमारत क्रमांक १८ मधील २४ नवीन सदनिका खरेदी केलेल्या सदस्यांना म्हाडा चे डेप्युटी रजिस्टर, डीव्हीजनल जॉईंट रजिस्टर (मुंबई विभाग) सहकार मंत्री तसेच तहसीलदार आणि कार्यकारी दंडाधिकारी कुर्ला आदी सर्व आस्थापणांकडून मेंबरशिप विषयी आदेश देऊन सुद्धा सोसायटी आणि वरद वास्तू विकासाकाने नवीन सदनिका धारकांना घर नाकारली आहेत. या त्रासदायक प्रकाराविरोधात या सदनिका धारकांनी शुक्रवार दिनांक २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता इमारत क्रमांक १८ समोर लोकशाही मार्गाने निषेध आंदोलनाचा पविता घेतला आणि आपल्या त्रिव्ह भावना व्यक्त करत निषेध केला.

याप्रसंगी येथील सदस्य विजय मोरे यांच्यासह २३ नवीन सदनिका धारकांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा मुंबई उपाध्यक्षा स्नेहा भालेराव, आरपीआय राजेश कटारनवरे, काँग्रेस यतीन साळवी, विशाल बिले, मधुकर साळवी, टिळकनगर फेडरेशन, ज्येष्ठ नागरिक समूह सुनील कनोजिया, शशिकांत मोरे आदीसह अन्य सामाजिक कार्यकर्ते या निषेध आंदोलनात उपस्थित होते. यावेळी उपस्थित अन्याय ग्रस्त नवीन सदनिकाधारकांनी विकासक व सोसायटीच्या प्रति निषेध व्यक्त केला. टिळक नगर सहयोग सहकारी सोसायटीमध्ये येथील मूळ विकासक महालक्ष्मी बिंदू डेव्हलपर्स ने या 24 सदस्यांना घर विकली होती विकासकाच्या मृत्यू नंतर सोसायटीने वरद वास्तू विकासकाची निवड केली आणि नव्या पुरवविकासात या 24 सदनिका धारकांचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे प्रकरण कोर्टात गेले स्टे आणि स्टे मिळत असल्याने सदनिका धारक बेहाल झाले असून अखेर मुख्यमंत्री या विषयी लक्ष घालतील अशी अपेक्षा आता निषेध आंदोलनाच्या माध्यमातून रहिवासी करत आहेत.

## पारधी समाजाच्या मानखुर्दमधील वसाहतीत स्वच्छता मोहीम

**सोलापूरच्या शासकीय अधिकाऱ्यांकडून पाहणी**

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील मानखुर्द येथील पारधी वसाहतीत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत सोलापूर येथील प्रशासकीय अधिकारी झाकडे , सरतापे यांनी भेट देऊन मुंबईतील पारधी वसाहतीचा समस्यांचा आढावा घेतला. यावेळी आदिवासी पारधी महासंघाचे मुंबई ,नवी मुंबई अध्यक्ष व काँग्रेस पक्षाचे पारधी समाज महाराष्ट्र सेल अध्यक्ष संतोष एकनाथ पवार यांनी उपस्थित पारधी

उपस्थित.होते. त्यांनी अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सोलापूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न केले पाहिजे, अशी मागणी यावेळी संतोष पवार यांनी लावून धरली. यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यानी पारधी समाजाच्या प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद देऊन हे प्रश्न तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी आदिवासी पारधी मुंबई, नवी मुंबई, ठाणे ,रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. नवी मुंबईतील केरला भवन समोरील आदिवासी पारधी वसाहतीच्या पुनर्वसन बाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. आदिवासी पारधी समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरोधात प्रशासकीय पातळीवर योग्य ते निर्णय घेण्याचे ठराव पारित करण्यात आले. यावेळी भीषण काळे, सोमनाथ पवार, शहाजी पवार, लक्ष्मण काळे आदी आदिवासी पारधी समाजातील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोठी स्वप्न बघा, छोटी सुरुवात करा; महत्त्वाचे म्हणजे सुरुवात करा.



- सिमॉन सिनेक
अमेरिकन लेखक

वृत्तमानस

मुंबई, रविवार, २९ सप्टेंबर २०२४




**३०-०९-२०२४ ते ०६-१०-२०२४ (रविवार ते शनिवार)**

**मेष - अनुकूल आठवडा जाईल.**
ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना चांगले यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सर्व दिवस आनंदी-चांगलेआहेत. सर्वस्तरावर चांगल्या गोष्टींची अनुकूलता वाढवु शकाल. कोणत्याही गोष्टीची काळजी करण्याची गरज भासणार नाही.ज्या गोष्टीचा श्री गणेशा होत नव्हतातो या सप्ताहात होणार आहे.इतरांचिही मदत वेळेवर मिळु शकेल.संघर्ष करावा लागत होता. तो आता करावा लागणार नाही. स्वभावबदल सर्वबाजुनी पोषक राहील.संयम बराराहील.उत्साह वाढु शकेल.व्यवसायात मोठा फायदा होऊ शकेल.नोकरदार कामात पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत उत्तम सफलता मिळु शकेल. शेजाऱ्यांना मदत कराल.धार्मिककार्यात सहभाग राहील. आनंदी सप्ताह असल्याने मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी -** आरोग्य उत्तम राहील.
**शुभदिनांक-१-२-३.**

**वृषभ - खर्च जपून करावेत.**
ग्रहसंकेतपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना चांगले यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना वा कोणतेही महत्त्वाचे काम करताना दूरदृष्टीपणा ठेवावा लागेल.स्वत:ची जबाबदारी इतरांवर टाकून चालनार नाही.त्यामुळे कदाचित नुकसान हो
ऊशकते.सामाजिक कामे करतांना वादविवाद टाळावे लागतील. प्रत्येक गोष्टीत संयम ठेवने अधिक पोषक राहु शकेल.समोरच्याने एखादा सल्ला दिला तर तो ऐकून घ्यायला काही हरकतनाही. स्वभावबदल चांगले यश देऊ शके ल.व्यवसायात अविचाराने गुंतवणूक टाळत रहाने बरे. नोकरदार कामात लक्ष द्यावे लागेल. नियोजन करावे.
**महिला -** आर्थिकस्तर बर्यापैकी समाधान देऊशकेल.आळस कमी करने पोषक राहु शकेल.वायफळ खर्च वेळिच कमी करावे लागतील.जोडीदाराची साथ मिळु शकेल.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभ दिनांक३-४-५.**

**मिथुन - मनमानी करु नका.**
ग्रहसंकेत पहाता प्रतिकुल सप्ताह जानार आहे.नियोजित कामे करतांना जास्त अपेक्षा बाळगु नका.आहे त्यात कामे करत रहावे. कोनतेही कामे करतांना नियम चौकटीतच राहुन करावे लागतील. असे हे दिवस सतर्क राहून कामे करावीत.घाईगडबडीने केलेली कोणतीही गोष्ट अंगलट येऊ शकते.त्यामुळे विचार करूनच निर्णय घ्यावे लागतील.इतरांच्या वैयक्तिक गोष्टीत अजिबात हस्तक्षेप करूनका."आपले काम भले नि आपण भले"असेच वातावरण ठेवा.दिवस अनुकूल नाही.फालतु खर्च कमी करावेत.व्यवसायात नको तो व्याप वाढवुन घेऊ नका.उगीचच त्रास वाढु शकेल. नोकरदार कामातील त्रुटी वेळीच दूर करणे बरे.
**महिला -** विनाकारण दडपन घेऊन अडचनी वाढवु नका. यशासाठी प्रयत्न सुरू करा.वायफळ खर्च वेळिच सांभाळावे लागतील.कुटुंब काळजी घ्यावी.वाद टाळावेत.
**विद्यार्थी -** स्वत:च्याआरोग्याकडेही लक्ष द्यावे.
**शुभदिनांक-४-५-६.**

**कर्क - तोंडी व्यवहार टाळावेत.**
ग्रहसंकेत पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना यशात वाढ होऊ शकेल.या सर्व दिवसांचा कालावधी चांगला कसा घालवता येईल ते प हात चला. कोणत्याही कामाचे नियोजन केल्याशिवाय ते काम करू नका. नाहीतर ज्यादा कामाचा व्याप वाढु शके ल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना वेळेचे बंधन पाळावे लागेल.जबाबदारीतून मोकळे होण्यासाठी घाई करून काम करायचे ठरवल्यास ते काम लांबणीवर जाऊ शकेल.आळशीवृत्ती बाजूला ठेवावी.स्वभावबदल पोषक राहील.व्यवसायात कामे करतांना तोंडी व्यवहार टाळने बरे राहील. नोकरदार वरिष्ठांचे काम ताबडतोब करून द्यावे लागेल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनने बरे राहील.मित्र-मैत्रिणींशी वैचारीक सलोखा चांगला वाढेल.मुलांसाठी वेळ द्यावा लागेल.घरगुती वातावरण चांगले राहु शकेल.
**विद्यार्थी -** आरोग्य जपत चला.
**शुभदिनांक-३०-१-२.**

**सिंह - उत्कर्ष होऊ शकेल.**
ग्रहबळपहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.ग्रहाचे भ्रमण सुखकर असेल. कौटुंबिकस्तरावर वावरतांना सर्व कामे अगदी ठरवून ठेवल्याप्रमाणे होत राहतील.त्यामुळे कोणत्याही कामाचा कंटाळा येणार नाही. प्रत्येक कामात उत्साह वाटु लागेल.इतरांनी मदत करावी ही अपेक्षा तुमच्या मनामध्ये येणार नाही.स्वत:चे काम स्वत: पूर्ण करण्याची जिद्द तुमच्या मनामध्ये राहील आणि ती पूर्ण करु शकाल. कामाचा श्री गणेशा होईल.ग्रहबदल लाभदायक असेल. व्यवसायामधे देवाण-घेवाण उत्तम यशस्वी राहु शकेल. नोकरदार वर्गाचा कामाच्या ठिकाणी उत्कर्ष होऊ शकेल. **महिला -** आर्थिक परिस्थिती चांगली असु शकेल.राजकीय क्षेत्रात शुभेच्छा मिळतील.मित्र-मैत्रिणींसोबत करमणूक होईल.आनंदी असाल. मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी -** आरोग्य उत्तम राहील.
**शुभदिनांक-१-२-३.**

**कन्या - दडपन टाळत चला.**
ग्रहबळपहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगलाजाऊ शकेल. नियोजितकामे करतांना यशात बर्यापैकी वाढ होऊ शकेल. कौटुंबिकस्तरावर वावरतांना कुटुंबाची काळजी घ्यावी लागेल. तसा या दिवसांचा कालावधी तुम्हाला जरा अस्वस्थ करणारा असु शकेल.मात्र या कालावधीत शांत डोके ठेवू न काम केल्यास त्रास होणार नाही.प्रत्येक गोष्टीत घाई करून चालणार नाही.जे तुम्हाला साध्य करायचे आहे ते करण्यासाठी न जमणाऱ्या गोष्टींच्या मागे लागू नका.संधी मिळाली की सर्वगोष्टी होतात.स्वभावबदल बरा राहील. व्यवसायातनवीन बदल करू नका.भांडवलाचा योग्य वापर करा.नोकरदार वर्गाचा कामासाठी वेळ जाऊ शकेल.
**महिला -** आर्थिक लाभ बर्यापैकी होऊ शकतील.भावंडांची मदत मिळु शकेल.तरिसुध्दा कुटुंबाची काळजी घेतलेली बरी असेल. यशाचे गणीत जुळुन येऊ शकेल.
**विद्यार्थी -** आहार सांभाळावा लागेल.
**शुभदिनांक-३-४-५.**

**तूळ - प्रकृती सांभाळावी लागेल**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना दगदग होऊ शकेल.वेळिच काळजी घ्यावी लागेल.या दिवसांत कोणतेही काम करताना एक घाव दोन तुकडे असे करून चालणार नाही.सध्याचे वातावरण उताराचे आहे असे म्हणायला हरकत नाही.शांत राहून कामे करावी लागतील.कोणी काय करावे आणि कोणी काय करू नये याचा सल्ला या दिवसांत कोणालाच देऊ नका. त्यामुळे गैरसमज निर्माण होऊ शकतात.जबाबदारीने वागल्यास त्रास होणार नाही.आत्मबदल चांगला जाऊ शकेल. व्यवसायात विनाकारण धावपळ करणे टाळनेबरे राही ल.नोकरदार वर्गाला नियमांचे पालन करावे लागु शकेल.
**महिला -** कदाचित अनपेक्षित आर्थिक लाभ होऊ शकेल. कुटुंबाशी वादविवाद टाळावे लागतील.नित्य उपासना चु कवु नये. जे आहे त्यातच समाधान मानावे लागेल.
**विद्यार्थी -** प्रकृती सांभाळावी.
**शुभदिनांक-४-५-६.**

**वृश्चिक - संयम ठेवलेला बरा राहील.**
ग्रहबळ पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संयम बाळगणे अधिक पोषक ठरु शकेल.कोणत्या वेळी काय बोलायचे कोणत्या वेळी काय बोलू नये याचासमज तुम्हाला या कालावधीत कदाचित  राहणार नाही.त्यामुळे तुम्ही स्पष्ट भूमिका घ्याल.यामुळे चांगली असलेली परिस्थितीसुद्धा कदाचित बिघडू शकते. त्यापेक्षा डोक्यावर बर्फ तोंडात खडीसाखर असे सूत्र सध्या लक्षात ठेवावे लागेल,तरच दिवस चांगले जाऊ शक तील.ग्रह बदल बोलतांना संयम सुचवतो आहे.व्यवसायात फायदा कमी झाला तरी चालेल.नुकसान होऊ देऊनये.नोकरदार धाडसाचे निर्णय घेणे योग्य राहणार नाही.
**महिला -** कदाचितआर्थिक चणचण भासु शकेल.जरासीधावपळही होऊ शकेल.लाभात वाढ होऊ शकेल.मनमानी टाळावी लागेल. कुटुंबाशी बोलताना संयम ठेवावा.
**विद्यार्थी -** प्रकृतीकडे लक्ष द्या.
**शुभदिनांक-३०-१-२.**

**धनू - यशस्वी आठवडा जाईल.**
ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना घवघवीतयश मिळवु शकाल.सामाजीक कामे करतांना निरर्थक चर्चेत सहभागी होऊ नका.सामाजीक प्रतिष्ठा वाढु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदीआनंद वाढत राहील.मनोरंजनातुन समाधान मिळवु शकाल.धार्मीक कामातुन पुण्य कमवु शकाल. कुटुंबासह दूरच्या प्रवासाचे उत्तम नियोजन करु शकाल. परोपकाराचे वलय सहजपणे आत्मसात करु शकाल.असनारे ग्रहवलय मात्र बोलतांना वेळीच संयम सुचवत आहे.व्यवसाय चालढकल करणे टाळल्यास उत्तम लाभ होतील. नोकरदार वर्गाने कामातुन अनेक लाभ होतील.
**महिला -** आर्थिकस्तर उत्तम राहु शकेल.तरिसुध्दा उधारीचे व्यवहार टाळावे लागतील.समाजमाध्यमांचा वापर उपयुक्त ठरु शकेल.घरातले वातावरण चांगले ठेवु शकाल.
**विद्यार्थी -** प्रकृती उत्तम राहील.
शुभदिनांक-१-२-३.

मकर - अंदाजे कृती टाळलेली बरी.
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना बर्यापैकी यश मिळवु शकाल हा सर्व दिवसांचा कालावधी चढउतारांचा राहणार आहे.या कालावधीत सहनशीलता वाढवावी लागेल.जशी परिस्थिती आहे तशी स्वीकारण्याचा प्रयत्न करणे पोषक राहील. कारण नसताना उगाचच कोणत्याही गोष्टीचा वाद वाढवू नका.अंदाजे कृती करणे टाळावी लागेल.इतरांना सल्ला न दिलेलाच चांगला. कौटुंबिकस्तरावर वावरतांना समाधान मिळेल.ग्रहवलय चांगलेच पोषक ठरु शकेल.व्यवसायातील जबाबदारी दुसऱ्यांवर अजिबात टाकू नका.नोकरदार वर्गाचे कामकाज सुरळीत चालेल.उपासना करा.
**महिला -** आर्थिक नियोजन अधिक पक्के करावे लागेल.राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा करताना मागील अनुभव विसरू नका.घरातज्येष्ठ व्यक्तींचा आदर करा.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक-३-४-५.**

**कुंभ - सहकार्य मिळवावे लागेल.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना सावधानता बाळगावी लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सप्ताहातील सर्वच दिवस बरे आहेत.समंसपना दाखवल्यास कोणत्याही दिवसांत विशेष काळजी करण्याची गरज नाही.त्यामुळे मनामध्ये वारंवार जो नकारात्मक विचार येत होता तोही आता कदाचित येणार नाही.काम करायला ही उत्साह वाटु लागेल.अडचणीचा कालावधी हळुहळु कमी होऊ शकेल. तणावाचे वातावरणच नाही असे नाही.जपुन रहावे.ग्रहवलय बरे राहील.व्यवसाय करतांना फायद्याचे प्रमाण साधारण राहु शकेल. नोकरदार वर्गाला कदाचित नोकरीचे प्रस्ताव येतील.
**महिला -** वरिष्ठांचे सहकार्य गोडबोलुन मिळवावे लागेल.कदाचित आर्थिक लाभ होऊ शकतील.मनमानी-राग-आळस हे सर्व वेळिच टाळलेले बरे राहु शकेल.उपासना करा.
**विद्यार्थी -** आरोग्य जरा नरम राहील.
**शुभदिनांक-४-५-६.**

**मीन - लाभ होऊ शकतील.**
ग्रहप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना घाईगडबड करु नये.सर्व दिवस साधारण चांगले असु शकतील.प्रत्येक वेळी होणारा संघर्ष सध्या तितकासा जाणवणार नाही.सकारात्मक गोष्टी घडु शकतील.उगाचच घाईगडबड करून कोणतेही काम करण्याची सध्या तरी गरज नाही.सध्या तुम्ही जे ठरवणार आहात त्याप्रमाणे बहुतांशी काम होत राहील.तेव्हा इतरांचे मार्गदर्शनही चांगले मिळेल.जी धरसोड वृत्ती होती तीसुद्धा कमी होईल.ग्रहवलय चांगलेच राहु शकेल. व्यवसायातील परिस्थिती नेहमीप्रमाने बरी राहु शकेल.नोकरदार वर्गाला पर्यायी गोष्ट स्वीकारणे योग्य राहु शकेल.
**महिला -** आर्थिक लाभ बर्यापैकी होऊ शकेल.सार्वजनिक क्षेत्रात सामूहिक गोष्टींची आवड राहील.नातेवाईकांशी कार्यक्रमानिमित्त भेटीगाठी होऊ शकतील.
**विद्यार्थी -** प्रकृती बरी राहील.
**शुभदिनांक-३०-१-२.**

# अक्षय शिंदेच्या एन्काऊंटर निमित्ताने...

प्रविण पुरो



गुन्हा कुठलाही असो, 26/11चा मुंबईवरील अतिरेकी हल्ला असो, की त्याआधी मुंबईत झालेले सिरियल बॉम्बस्फोट असोत किंवा गँगरेप असो, आरोपीला एक्सपोज करणं, त्याच्या साथीदारांच्या मुसक्या आवळणं हे तपास यंत्रणेचं काम असतं. कोणत्याही गुन्ह्यात सामील असलेल्यांना लागलीच यमसदनी पाठवणं पोलिसांना अडचणीचं कधीच नसतं. मुंबई पोलिसांमधल्या जाँबाज चार अधिकाऱ्यांना जिवे मारणाऱ्या अजमल कसाब याला तर पोलिसांना जागीच ठार करता आलं असतं. पण या मागचा पाकिस्तानचा हात उघड झाला नसता. असे पुरावे नष्ट होऊ नयेत यासाठी खरं तर पोलिसांनी काळजी घेतली पाहिजे. पण कधीकधी पोलीस होत्याचं नव्हतं करतात. बदलापूर घटनेतील आरोपी असलेल्या अक्षय शिंदे याला एका गोळीत संपवणाऱ्या पोलिसांना कोणाला तरी वाचवायचं होतं हे स्पष्ट दिसतं. तसं नसतं तर पोलिसांनी त्याला ठार केलं नसतं. या घटनेच्या मुळाशी जायला शिंदे हाच एक भक्कम पुरावा होता. तोच नष्ट केला की पाप धुतले जातील, अशी मानसिकता या घटनेमागे लपली आहे. आता आपल्यावरील हे आरोप खोडून काढण्यासाठी विरोधकांना आणि पत्रकारांना नको ती दुषणं देण्याचे उद्योग शिंदे, फडणवीस यांच्यासह त्यांचे प्रवक्ते, समर्थक आणि भक्त करू लागले आहेत. यामुळे लोकांच्या मनात निर्माण झालेली संशयाची अडी दूर होणार  नाही. ती अधिकच वाढेल आणि त्याचे विपरीत परिणाम होतील, हे या मंडळींनी लक्षातच घेतलेलं दिसत नाही.

अक्षय शिंदे हा पोलिसांवर हात उचलू शकतो का, याविषयी प्रत्येकाच्या मनात साशंकता होती आणि आहे. यामुळेच त्याला मारणाऱ्यांना कोणाला तरी वाचवायचं आहे किंवा त्यांना वाचवावं म्हणून कोणीतरी सुपारी दिली असेल, अशा शंकेला वाव आहे. या शंका येणं म्हणजे आक्षयला सहानुभूती देणं असा अर्थ जाणीवपूर्वक काढला जातो आहे. आणि तो नेहमीप्रमाणेच सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून आणि समर्थकांकडून होतो आहे. चित्रा वाघांसारख्या अतिहुशार नेत्या यात नाक खुपसतात आणि पोलीस दलाला आणखीच खायित लोटतात. यामुळे शंकेची जागा अधिकच गढद होते. आक्षयला ठार मारणाऱ्या पोलिसांच्या कृतीविषयी केवळ सामान्य माणसालाच प्रश्न पडले असं नाही तर मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनाही त्याची उत्तरं विचारली आहेत. न्यायालयाने ही उत्तरं मागितली नसती तर जाब विचारणाऱ्या प्रत्येकाला या सत्तेने हाताश केलं असतं.

मुंबई पोलिसांनी अतिरेकी ठरवून टाकलेल्या ख्वाजा युनूसचं प्रकरणही असंच गंभीर आणि तितकंच पोलीस दलाची कातडी सोलणारं ठरलं होतं. 2002मध्ये घाटकोपरच्या बसमधील स्फोटप्रकरणात पोलिसांनी ख्वाजाला अटक केली होती. न्यायालयात नेत असताना तो पळाला असं हातोहात खोटं बोलणाऱ्या पोलिसांमुळे ख्वाजाच्या आईला सरकारला मोठी रक्कम नुकसान भरपाईपोटी द्यावी लागली होती, हे पोलीस विसरलेले दिसतात. हा निर्णयही मुंबई उच्च न्यायालयाने केला होता. गुन्हा केला हे वदवून घेण्यासाठी पोलिसांनी त्याला ठाण्यातच ठार केल. मुकेश अंबानी यांच्या अंटालिया स्फोटकप्रकरणातील मनसुख हिरेन याच्या हत्याप्रकरणात कोठडीत असलेला सचिन वाझेच ख्वाजाच्या हत्येतील एक आरोपी होता. ख्वाजाच्या छाताडारावर मारलेल्या लाथेने त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. तेव्हा न्यायालयाला या प्रकरणाची सीआयडी चौकशी करायचे आदेश द्यावे लागले. पोलिसांनी त्याला मारून त्याला चिरनेरच्या जंगलात गायब केल्याचं पुढे सीआयडी चौकशीत उघड झालं. हा सारा इतिहास पोलिसांच्या काळ्या कारनाम्याची चिरफाड करणारा असूनही पोलीस पुन्हा असे गुन्हे करायला मागेपुढे पाहत नाहीत, हे विशेष. यामुळेच आक्षय शिंदेच्या हत्येच्या प्रकरणाची सखोल चौकशी होणं आवश्यक आणि तितकंच गरजेचंही आहे. अन्यथा ज्यांनी बालिकांवर अत्याचार केले ते सहिसलामत सुटतील हे सांगायची आवश्यकता नाही.

पोलीस संशयिताला असा थेट 'न्याय' देणार असतील, तर न्यायालयं आणि त्यातल्या न्यायदानाची आवश्यकताच लोप पावते. हे संविधानाचं मुलमंत्र खूप काही सांगून जातं. यामुळेच जे प्रश्न न्यायालयाने विचारले त्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर पोलिसांनी आणि सरकारने दिलंच पाहिजे. ते न देता पोलिसांना योग्य ठरवलं तर आज एक आक्षयचा 'न्याय' इतरांच्या वाट्यालाही येईल. अतिशयोक्ती वाटेल पण भ्रष्टाचार लपवण्यासाठी उद्या तो राजकोट किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणाऱ्या जयदिप आपटेच्याही वाट्याला येऊ शकतो. 26 लाखाच्या पुतळ्यासाठी 32 कोटी खर्च करणारे काहीही करू शकतात. पोलीस आणि राजकारणाच्या अभद्र युतीचा हा परिणाम होय. सत्ताधाऱ्यांसाठी पोलीस काहीही करायला मागेपुढे पाहत नाहीत, हे उघड सत्य पुढे आल्याने अधिक काळजी घेणं आवश्यक बनतं.

शिंदे हा बदलापूर घटनेचा एकमेव आरोपी असता तर इतक्या टोकाचा निर्णय पोलिसांनी घेतला नसता. एक सामान्य आरोपी शस्त्रधारी पाच पोलिसांना आवरू शकत नाही, हे शेंबडं पोरही मान्य करणार नाही. पोलिसाच्या हातातील शस्त्र हिसकावून ते चालवणं हा पोरखेळ थोडाच आहे? शस्त्र हिसकावलं जात असताना त्याच्या बरोबर असलेले पोलीस काय करत होते? हा प्रश्न कोणीही विचारावा असा आहे. चौघांपुढे एक शिरजोर होऊ शकतो? तो ही बेड्या घातलेल्या अवस्थेत? ज्या दिवशी ही घटना घडली त्या दुपारी शिंदेच्या आई-वडिलांनी त्याची तळोजा कारागृहात भेट घेतली. तेव्हा पोलिसांनी दिलेला एक लिखित कागद शिंदेने त्यांना दाखवला. हा कोणता कागद होता? याचं उत्तर कोण देणार?

ज्या शाळेत बालिकांवर अत्याचार झाले त्या शाळेतील घटनेवेळच्या सीसीटीव्ही फुटेजचं काय झालं? ते गायब करणारा कोण या प्रश्नाचं उत्तर गृहखातं चालवणाऱ्या देवेंद्र फडणवीसांनी का घेतलं नाही? लहान मुलींवर अत्याचार करणाऱ्या याच शिंदेवर गुन्हा नोंदवायला 12 तासांचा अवधी का लागला? ज्यांच्याविरोधात गुन्हे नोंदवण्यात आले त्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना अटक न करण्याची पोलिसांची कृती संशयास्पद का वाटली नाही?

दुर्दैवं म्हणजे पोलिसांच्या या कारवाईनंतर राज्यात झालेल्या बॅनरबाजीचा उबगच यावा. पोलिसांनी हटवलेल्या या बॅनरबाबत मनिषा चौधरी पोलीस ठाण्यात जाऊन जाब विचारतात याचा अर्थ काय काढायचा? 'देवाभाऊच्या राज्यात गुन्हेगार ढगात', 'गुन्हेगाराचा 'बदला'पूर' अशी खुलेआम बॅनरबाजी करून मतं मिळतील, असं वाटणाऱ्यांना आपल्या कृतीची जराही लाज वाटली नाही. या एन्काऊंटरप्रकरणात स्वत:ची पाठ थोपटून घेणाऱ्यांनी पालघरच्या बलात्काऱ्याचं काय केलं? यशश्रीच्या उरणमधील हत्याऱ्याचं काय केलं? याचं साधं उत्तर दिलं नाही. कारण त्यामागे कोणाला वाचवावं असा प्रकार नव्हता. शिंदेला मारलं नसतं तर सारा रोष संघ आणि भाजपवर येणं स्वाभाविक होतं. शिंदेला संपवल्याशिवाय हा रोष थांबला नसता, याची जाणीव झालेल्यांनी शिंदेला संपवलं. एकटे पोलीस याला कारण आहेत, असं मानण्याचं कारण नाही. यामागे सुप्त डोकं आहे. एन्काऊंटर झाल्यानंतर यात निर्माण झालेली राजकीय स्पर्धा तर अतिगंभीरच म्हटली पाहिजे. ही स्पर्धा सत्तेची आहे. एकनाथ शिंदेंचे खासदार आणि प्रवक्ते थेट हॉस्पिटलला पोहोचतात आणि मुख्यमंत्र्यांच्या वतीने जखमी पोलीस अधिकाऱ्यांचं कौतुक करतात, हे अतिरेकाचं टोक झालं. शिंदेला नजरेपुढे ठेवून स्वत:ची पोळी भाजण्याचा हा प्रकार होय.

असे एन्काऊंटर करण्याची पध्दत उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये सर्रास अवलंबली जाते. गुन्हे थांबवण्याऐवजी खऱ्या गुन्हेगारांकडून मलिदा मिळावा, यासाठी असे एन्काऊंटर केले जातात. ते बाहेरही येत नाहीत आणि त्याची साधी चर्चाही होत नाही. भ्रष्ट राजकारणात महाराष्ट्र हे राज्य उत्तर प्रदेश आणि बिहारच्या पुढे याआधीच गेलं आहे. आता ते एन्काऊंटरसाठीही या राज्यांशी बरोबरी करत असेल तर महाराष्ट्राचं काही खरं नाही. न्यायालयाच्या निर्णयाने आरोपीचा गुन्हा सिध्द होतो आणि त्यानंतर त्याला शिक्षा केली जाते. गुन्हा सिध्द होण्याआधी एन्काऊंटरसारखा खुष्कीचा मार्ग अवलंबला की अपराध्याला सहानुभूती मिळते. ती सहानुभूती युती सरकारच्या गृह खात्याने आणि एन्काऊंटर करणाऱ्या पोलिसांनी शिंदेला मिळवून दिली आहे, असं म्हटलं तर गैर नाही. यामुळेच या प्रकरणाची सखोल चौकशी व्हायला हवी...

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)**

## बदलापूरच्या उपजिल्हा रुग्णालयाला सामान्य रुग्णालयाचा दर्जा

**बदलापूर:** बदलापूरसह आसपासच्या ग्रामीण भागातील रुग्णांसाठी महत्त्वाच्या असलेल्या बदलापूर शहरातील उपजिल्हा रुग्णालयाचे रूप लवकरच बदलणार असून ५० खाटांचे हे रुग्णालय आता २०० खाटांचे होणार आहे. राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने या रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय घेतला आहे. शस्त्रक्रिया विभागासह विविध आरोग्यांचे तज्ञ, रक्तपेढी यासह इतर अनेक सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्याचा लाखो नागरिकांना फायदा होणार आहे.बदलापूर शहरात असलेले उपजिल्हा रुग्णालय बदलापूर शहरासह अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण रुग्णांसाठी उपयोगी आहे. बदलापूर शहरातील अनेक रुग्ण येथे येत असतात सात वर्षांपूर्वी २०१७ या वर्षात या रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला होता. त्यावेळी खाटांची संख्या ५० करण्यात आली होती. आता शासनाच्या आरोग्य विभागाने या रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता येथील खाटांची संख्या २०० होणार आहे. येथील प्रसूती विभाग, सामान्य रुग्ण विभाग यातील खाटांची संख्याही यामुळे वाढणार आहे. सोबतच अतिदक्षता विभागाची ही सुरुवात या रुग्णालयात होणार आहे.

### म ह त्वा चे

## 'एपीएमसी'त अफगाणिस्तानमार्गे चिनी लसूण



**नवी मुंबई :** भारतात बंदी असलेला चिनी लसूण वाशीतील 'एपीएमसी'त अफगाणिस्तानमार्गे दाखल होत आहे. बाजारात येणारा हा लसूण चीनचा आहे की नाही, याची शाश्वती मिळत नसल्याने प्रशासनापुढे मोठा पेच उभा आहे. एपीएमसीतील विशिष्ट लसणाची समितीमार्फत माहिती घेतल्यानंतर ठोस पुरावा मिळाला नाही. सरकारने काही वर्षांपासून चीनमधील कृषीमालाची आयात थांबवली आहे. त्यात लसणाचाही समावेश आहे. मात्र गेले दोन महिने भारतातील लसणाचे उत्पादन घटल्याने भाव घाऊक बाजारात ३५० रुपये तर किरकोळ बाजारात ४०० रुपयांच्या घरात पोहोचला आहे.त्यामुळे लसणाचे वाढते दर पाहता काही व्यापाऱ्यांनी नफ्यासाठी एपीएमसी बाजारात चिनी लसणाची विक्री सुरू केली आहे. आधी हा लसूण नेपाळमार्गे भारतात दाखल होत असे. मात्र आता आयातदारांनी चीनी लसूण प्रथम अफगाणिस्तानात मागवून तो नंतर भारतात अफगाणी लसूण म्हणून विक्री सुरू केल्याचे बोलले जात आहे.

## अवजड वाहनांवर कारवाई

**उरण :** शिवडी-न्हावा अटल सेतू महामार्गावर मागील सात महिन्यांत १,८५३ अवजड वाहनांवर न्हावा-शेवा वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. वाहनचालकांकडून २१ लाखांचा दंड वसूल केला. न्हावा-शेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जी. एम. मुजावर यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथकाने रस्त्यावर बेकायदेशीर उभ्या असलेल्या आणि महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण करून अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या अवजड वाहनांवर कडक कारवाईचा बडगा उगारला असून मागील सात महिन्यांत वाहतूक पोलिसांनी अवजड वाहनांवर कारवाई केली.या जेएनपीटी परिसरात केंद्र शासनाने सहा व आठ पदरी महामार्ग साकारले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी जाणवत नाही; मात्र रात्रीच्या वेळी अवजड वाहनचालक बेशिस्त वाहन चालवत असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई सुरूच ठेवण्यात आल्याने वाहनचालक शिस्तीने वाहन चालवत आहेत

## मांडवा जेट्टीजवळ मृतदेह सापडला

**अलिबाग :** मांडवा जेटीजवळ कोळगाव समुद्रकिनाऱ्यावरील कांदळवनात ४० ते ४५ वयाच्या पुरुष जातीचा मृतदेह गुरुवारी (ता. २६) दुपारी सापडला होता; पण कुजलेल्या अवस्थेत असल्याने त्याची ओळख पटलेली नाही. पोलिसांना पंचनामा करताना कोणत्याही प्रकारची कागदपत्रे व इतर वस्तू मिळालेल्या नाहीत. तसेच, समुद्राच्या पाण्यात बुडून हा व्यक्ती मरण पावल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. याबाबत मांडवा सागरी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलिसांनी मृतदेहावर अंत्यसंस्कार केले आहेत.

# डोंबिवलीत 7 कोटींची 'व्हेल'ची उलटी जप्त

### सापळा रचत तिघांना अटक

**प्रतिनिधी**
**डोंबिवली**

बदलापूर पाईपलाईन रोडलगत मौर्या ढाब्याजवळ व्हेल माशाची विक्री करण्यासाठी आलेल्या तिघांना कल्याण गुन्हे शाखा घटक 3 ने अटक केली आहे. त्यांच्याजवळ 5 किलो 642 ग्रॅम वजनाची व्हेल माशाची उलटी जप्त केली आहे. याप्रकरणी अनिल भोसले (वय 55), अंकुश माळी (वय 45) आणि लक्ष्मण पाटील (वय 63) यांना पोलिसांनी अटक केली असून मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात त्यांना हजर करण्यात आले असता 1 ऑक्टोबर पर्यत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



कल्याण गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले यांना गुप्त बातमीदार यांच्या मार्फत माहिती मिळाली होती की शनिवारी दुपारी 2 वाजताच्या दरम्यान काही व्यक्ती या मारुती सुझुकी वॅगनर गाडीतून व्हेल माशाची उलटी विक्री करण्यासाठी येणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसारकल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले, पोलीस हवालदार विश्वास माने, विलास कडु, गुरुनाथ जरग, मिथुन राठोड, गोरक्ष शेकडे यांच्या पथकाने मौर्या ढाब्याजवळ सापळा रचला. ठरल्या वेळेत तीन जण मानपाडा भागातील मौर्या ढाब्या जवळ एका वॅगनर गाडीतून तिघे संशयित तिथे आले.

पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत चौकशी केली असता ते उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले. पोलिसांनी गाडीची झडती घेतली असता सफेद रंगाच्या पिशवीत सेलोटेप ने पॅक केलेली व्हेल माशाची उलटी आढळून आली. व्हेल माशाच्या उलटीची बेकायदा वाहतूक करून बाजारात विक्री करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल पोलिसांनी वन्य जीव संरक्षण कायद्याने तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. 5 किलो 642 ग्रॅम वजनाची 6 करोड 20 लाख रुपये किंमतीची ही उलटी पोलिसांनी जप्त केली आहे. तसेच गाडी, मोबाईल हा मुद्देमाल देखील पोलिसांनी जप्त केला आहे. ही उलटी आरोपींनी कोणाला विक्री करण्यासाठी आणि कोठून आणली होती याचा तपास सुरू केला आहे.

# दोन वर्षांत 35 हजार उद्योजक निर्माण झाले उदय सामंत यांचा दावा

**प्रतिनिधी**
**उलवे**

महाराष्ट्रात दोन वर्षात ३५ हजार उद्योजग निर्माण झाल्याचा दावा शनिवारी उलवे नोड मधील महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रमात बोलतांना राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला.एमआयडीसीने महाराष्ट्राच्या उद्योगा विभागाने विविध योजना,महत्वकांक्षी निर्णय,नवनवीन प्रकल्प,विदेशी गुंतवणूक या माध्यमातून कोकण विभागीय महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विकास कामांचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. बा. पाटील भूमिपुत्र भवन,उलवे नोड येथे आयोजित करण्यात आला होता. एमआयडीसी ने ३०० औद्योगिक क्षेत्र अडीच लाख एकर क्षेत्रावर उद्योग प्रस्तावित आहे.



शासन आणि उद्योग यांच्यातील दुवा २५०० एम एल डी पाणी पुरवठा केला जातो. विदेशी गुंतवणूकदार यांना आकर्षित करण्यासाठी पर्यावरण पूरक उद्योग उभारण्यात येत आहेत. १० सेझ, वाईन पार्क असे अनेक उद्योग व्यवसाय निर्माण झाले आहेत. यावेळी कोकणातील महाराष्ट्राची उद्योग भरारी उद्योग गुजरात ही टीका कायम केली जाते. देशाच्या इतिहासात पहिला व्हाईट पेपर काढला केलेल्या विकास कामातून उत्तर देत आहे. दोन वर्षात ३५ हजार उद्योजग निर्माण झाले. उद्योग नगरी गडचिरोली बनविणार राज्यातून उद्योग गेले नाहीत तर आले. आय टी पॉलिसी सुरू केली. दाओस मध्ये ४ लाख कोटींचे करार केले. महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे आणि राहणार असल्याचा दावा उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार सुनील तटकरे यांनी आज केला. माजी खासदार रामशेठ ठाकूर,आमदार महेश बालदी हे उपस्थित होते.

# वकिलांना लवकरच विद्यावेतन मिळणार - उपमुख्यमंत्री फडणवीस

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

वकिली क्षेत्रात येणाऱ्या नवीन वकिलांसाठी सरकार भविष्यात विद्यावेतन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे असून त्यावर नक्की विचार केला जाईल असे मत शनिवारी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी मुंबईतील नेरुळ येथे व्यक्त केले. देशातील पहिल्या अॅडवोकेट अकॅडमी आणि संशोधन केंद्राचे (रिसर्च सेंटर) भूमिपूजन शनिवारी सकाळी तळोजा येथे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश भूषण आर. गवई आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाल्यानंतर उपमुख्यमंत्री फडणवीस नेरुळ येथील कार्यक्रमात बोलत होते. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्ना वारले, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश देवेंद्रकुमार उपाध्याय, भाजपचे आ. प्रशांत ठाकूर आणि वकिल संघटनेचे विविध पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्या संयुक्तविद्यमाने हा सोहळा तळोजा आणि नवी मुंबई तील नेरुळ येथे पार पडला.



तळोजा येथील भूमिपूजनानंतर नेरुळ येथील सेक्टर ७ मधील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठातील सभागृहात जाहीर कार्यक्रम झाला. यावेळी मोठ्या संख्येने वकिल संघटनेचे सदस्य उपस्थित होते. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे अभिनंदन केले. तसेच या अकादमीसाठी शासन १० कोटी रुपयांचा निधी देणार असल्याचे जाहीर केले.

# भाजप- शिंदे सेनेतील वाद विकोपाला

### थेट पोलीस आयुक्तांकडे तक्रार

**प्रतिनिधी**
**डोंबिवली**

ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीत वादाला तोंड फुटलं आहे. भाजप आणि शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये टोकाचे वाद निर्माण झाले आहेत. डोंबिवली बॅनर प्रकरणानंतर शिवसेना शिंदे गट भाजप पदाधिकार्यांमध्ये कुरघोड्या सुरूच आहेत. आता हा वाद विकोपाला गेला आहे. दीपेश मला गणपत गायकवाड व्हायचं नाही. भाऊ मला महेश पाटील व्हायचं नाही, अशी पोस्ट व्हायरल करत मला धमकवत असल्याचे आरोप करत शिवसेना शिंदे गटाचे युवासेना प्रदेश सचिव दीपेश मात्रे यांनी केला आहे. याबाबात दीपेश यांनी पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डोंबिवलीत राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. डोंबिवली विधानसभा मतदार हा भाजपचा बालेकिल्ला असून सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण हे या मतदार संघातून तीनदा मोठ्या मताधिकक्याने निवडून आले आहेत. या मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाकडून दीपेश म्हात्रे इच्छुक आहेत. त्यांनी देखील निवडणूक लढण्याची तयारी सूरु केली आहे. त्यामुळे महायुतीत या जागेवरून वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या विरोधात बॅनरबाजी करणारे शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी दिपेश म्हात्रे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे . या प्रकरणी पोलिसांनी नोटीस दिल्यानंतर दिपेश म्हात्रे यांनी विष्णू नगर पोलीस स्टेशनमध्ये जात पोलिसांसमोर आपली बाजू मांडली.

रविंद्र चव्हाण यांच्या वाढदिवसाला दिपेश म्हात्रे यांनी खड्ड्यांचे बॅनर लावले. त्यानंतर पुन्हा शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये नवा वाद निर्माण झाला. सोशल मिडियावर दिपेश मला गणपत गायकवाड व्हायचे नाही. तसेच भाऊ मला महेश पाटील व्हायचं नाही, अशी पोस्ट व्हायरल झाली. या पोस्टच्या माध्यमातून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे, असे सांगत दिपेश म्हात्रे यांनी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याकडे तक्रार केली. संबंधितांवर ठोस कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. दीपेश म्हात्रे यांच्या तक्रारीनंतर भाजप देखील आक्रमक झाली आहे. दीपेश म्हात्रे यांनी अर्ज देताना वापरलेल्या पत्रावर केडीएमसीचा लोगो असल्याचं आढळून आलं.

# 'स्वच्छता ही सेवा' मोहीमेंतर्गत पालिकेच्यावतीने ' एक पेड मॉं के नाम' उपक्रमाचे आयोजन

**प्रतिनिधी**
**पनवेल**

स्वच्छ भारत अभियानाच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय आणि केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छता ही सेवा' मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत एक पेड मॉं के नाम' उपक्रमाच्या माध्यमातून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २७ सप्टेंबर रोजी चारही प्रभागांमध्ये करण्यात आले.



'एक पेड मॉं के नाम' उपक्रमांतर्गत महापालिकेने सुमारे साडेसहा हजार झाडे रोपण करण्याचा निश्चय केला आहे. याची सुरूवात शुक्रवारपासून करण्यात आली. या वृक्षारोपण कार्यक्रमास घनकचरा व स्वच्छता विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, सहायक आयुक्त डॉ.रुपाली माने, विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य आरोग्य निरीक्षक, सर्व आरोग्य निरीक्षक, त्या त्या परिसरातील जेष्ठ नागरिक, महिला,विविध शाळांचे विद्यार्थी,एन.एस.एसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छतेच्या प्रयत्नांमध्ये सामूहिक कृती आणि नागरिकांची शहर स्वच्छतेतील सहभागाची भावना प्रज्वलित करण्यासाठी स्वच्छता ही सेवा मोहीम आयोजित करण्यात आलेली आहे. या स्वच्छता मोहिमेमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन घनकचरा व स्वच्छता विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे.

# 'स्वच्छता रन'मध्ये धावले 1 हजारहून अधिक नवी मुंबईकर

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

'निश्चय केला, नंबर पहिला' अशा घोषणा देत 1 हजारहून अधिक नवी मुंबईकरांनी आज 'स्वच्छता रन' मध्ये सहभागी होत स्वच्छतेचा जागर केला. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियानांतर्गत आयोजित केलेल्या सर्वच उपक्रमांना नागरिकांचा भरघोस प्रतिसाद लाभत आहे. आजही नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून महापालिकेच्या आयकॉनिक मुख्यालय इमारतीसमोर आयोजित करण्यात आलेल्या 'स्वच्छता रन' मध्ये रात्रभर व पहाटे मोठ्या प्रमाणात पाऊस असूनही स्वच्छता ध्येयाने भारलेले हजारहून अधिक नागरिक अतिशय उत्साहाने धावले.



याआधी 22 सप्टेंबर रोजी याच ठिकाणी सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्येही 500 हून अधिक सायकलपटू उत्साहाने सहभागी झाले होते. आजही स्वच्छता रनमध्ये पाऊस असूनही हजारहून अधिक स्वच्छता ध्येयाने भारलेले नागरिक नमुंमपा मुख्यालयापासून वजीराणी स्पोर्ट्स क्लबपर्यंत व तेथून परत मुख्यालयापर्यंत धावले.

# घटस्फोटासाठी मदत करण्याच्या बहाण्याने विवाहितेवर बलात्कार

**प्रतिनिधी**
**पनवेल**

पनवेल भागात राहणाऱ्या तरुणाने पतीपासून विभक्त राहत असलेल्या महिलेला घटस्फोट घेऊन देण्यास मदत करण्याचे तिच्यासोबत लग्न करुन तिच्या मुलांचा सांभाळ करण्याचे ओशासन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे.

सुमित सुभाष पांचाळ (२८) असे या तरुणाचे नाव असून खांदेशर पोलिसांनी त्याच्या विरोधात लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याप्रकरणी त्याला अटक केली आहे. या प्रकरणातील पिडीत महिला नवीन पनवेल भागात राहण्यास आहे. तर तिच्यावर अत्याचार करणारा आरोपी सुमित पांचाळ मुळचा चिपळुण येथील असून सध्या तो नवीन पनवेल येथे कामानिमित्त राहण्यास आहे. वर्षभरापूर्वी सुमित पांचाळ याची पतीपासून विभक्त राहत असलेल्या पिडीत महिलेसोबत ओळख झाली होती.

या ओळखीचे रुपांतर प्रेमात झाल्यानंतर सुमित याने तिला तिच्या पतीपासून घटस्फोट घेऊन देण्यास मदत करण्यासह तिच्यासोबत लग्न करुन तिच्या सांभाळ करण्याचे ओशासन दिले हेते. त्यानंतर त्याने पिडीत महिलेसोबत तिच्या नवीन पनवेल येथील घरामध्ये अनेकवेळा शरीरसंबंध प्रस्थापित केले.

# नवी मुंबईत 1 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी बनविल्या शोभिवंत वस्तू

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

प्लास्टिकमुळे पर्यावरणाला होणारा धोका लक्षात घेऊन एकल वापर प्लास्टिक आपल्या दैनंदिन वापरातून हद्दपार करायला हवे यादृष्टीने प्लास्टिकमुक्त शाळा ही संकल्पना महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता ही सेवा पंधरवड्यानिमित्त प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.



या अनुषंगाने शालेय स्तरावर प्लास्टिक बॉटलसपासून शोभिवंत वस्तू बनविण्याच्या अभिनव उपक्रमाचे आयोजन नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने शालेय स्तरावर करण्यात आले होते. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या 57 प्राथमिक, 23 माध्यमिक शाळांप्रमाणेच खाजगी 333 शाळांतील 1 लाख 570 विद्यार्थ्यांनी सहभागी होत प्लास्टिकच्या बाटल्यांपासून शोभिवंत वस्तू तयार केल्या. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी पालकही विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होते. या उपक्रमामधून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मुक्त वाव मिळाल्याचे अनुभवता आले. प्लास्टिक बॉटलसपासून विद्यार्थ्यांनी पेन होल्डर, फुलदाण्या, गृहसजावटीच्या नानाविध वस्तू, फुले असे विविध अविष्कार घडविले.

# 'माझी वसुंधरा अभियान 4' मध्ये 10 लाख लोकसंख्येपेक्षा मोठ्या शहरांच्या अमृत गटात नवी मुंबई राज्यात व्दितीय

### महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नागरिकांचे मानले आभार

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येत असलेल्या 'माझी वसुंधरा अभियान 4.0' मध्ये नवी मुंबई महानगरपालिका 10 लक्षपेक्षा अधिक लोकसंख्येच्या मोठ्या शहरांच्या अमृत गटात राज्यस्तरावर 'द्वितीय क्रमांकाची मानकरी' ठरलेली आहे. राज्यातील 'क' वर्ग महानगरपालिकांमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेची कामगिरी 'सर्वप्रथम क्रमांकाची' आहे.




याशिवाय 'भूमी थीमॅटीक' कॅटेगरीमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस राज्यस्तरीय उच्चतम कामगिरीचे विशेष पारितोषिकही जाहीर झाले आहे.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी हा पुरस्कार पर्यावरणप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांच्या सक्रिय सहभागाला समर्पित केला असून पर्यावरण विषयक नानाविध उपक्रमांमध्ये सहभागी होणारे पर्यावरणप्रेमी नागरिक, लोकप्रतिनिधी, विविध स्वयंसेवी संस्था - मंडळे त्याचप्रमाणे स्वच्छता, उद्यान व विविध विभागांतील कर्मचारी आणि प्रसारमाध्यमे यांच्या एकत्रित सहभागामुळे हा पुरस्कार प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. या यशाबद्दल आयुक्तांनी समस्त नवी मुंबईकर नागरिकांचे अभिनंदन करीत मौलिक सहकार्याबद्दल आभार मानले आहेत.

भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाच्या 5 घटकांवर आधारित 'माझी वसुंधरा अभियान 4.0' हे 1 एप्रिल 2023 ते 31 मे 2024 या कालावधीत राबविण्यात आले.

# शहरातील मेट्रोच्या रखडलेल्या कामामुळे आजी आणि माजी आमदारांमध्ये खडाजंगी

**प्रतिनिधी**
**ठाणे**

मीरा-भाईंदर शहरातील मेट्रोच्या रखडलेल्या कामाच्या मुद्द्यावरून आजी आणि माजी आमदार यांच्यात खडाजंगी पाहायला मिळाली. माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या 'सेव्हन इलेव्हन' कंपनीवर स्थानिक अपक्ष आमदार गीता जैन यांनी गंभीर आरोप केलाय. मेट्रोचं प्रस्तावित काशीगाव स्थानक उभारण्यात येत आहे, ती जागा हस्तांतरित करत नसल्यानं मेट्रोचं काम रखडलंय. गेल्या 22 महिन्यांपासून काशीगाव स्थानकाचं काम थांबलंय. त्यामुळं प्रत्येक महिन्याला 3 कोटी रुपये भुर्दंड लागत असल्याचा आरोप आमदार गीता जैन यांनी केलाय.





मीरा भाईंदर शहरात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले असून स्थानिक अपक्ष आमदार गीता जैन आणि माजी आमदार नरेंद्र मेहता मेट्रोच्या मुद्द्यावरून आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. "माजी आमदार मेहता यांच्या 'सेव्हन इलेव्हन' कंपनीच्या मालकीची जमीन 'एमएमआरडीए'कडं हस्तांतरित न झाल्यामुळं मेट्रोचं काम रखडलं आहे. स्थानिक नेते मेहता हे एवढ्या मोठ्या प्रकल्पात अडथळा आणण्याचं काम का करत आहेत?" असा सवाल आमदार गीता जैन यांनी केला. "'एमएमआरडीए'चे अधिकारी संजय मुखर्जी यांची भेट घेऊन सदर जागेचं भूसंपादन करून 15 दिवसांत जागा ताब्यात घेण्याची विनंती केली," असं गीता जैन यांनी सांगितलं. माजी आमदाराच्या राजकीय दबावामुळं हे काम रखडलं असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## अंबाबाई मंदिरातील उत्सवमूर्तीचे आज दर्शन बंद

**कोल्हापूर :** साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या करवीर निवासिनी आई अंबाबाई देवीचा शारदीय नवरात्रोत्सव 3 ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. तत्पूर्वी मंदिरातील गाभाऱ्याची स्वच्छता करण्याचं काम आजपासून सुरू झालं असून, मूळ उत्सवमूर्तीचे दर्शन सकाळी 9 ते सायंकाळी 6 या कालावधीत बंद ठेवण्यात आलंय. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वतीने भाविकांची सोय व्हावी, यासाठी मंदिरातील महासरस्वती मंदिराजवळ उत्सवमूर्ती दर्शनासाठी ठेवण्यात आलीय. आज देवीच्या सोने-चांदीच्या अलंकारासह साहित्याची स्वच्छता करण्यात येत असून, गरुड मंडपाची प्रतिकृतीही उभारण्यात येत आहे. आज सायंकाळी आरती आणि सालंकृत पूजा झाल्यानंतर मूळ उत्सवमूर्ती दर्शनासाठी खुली होणार आहे. देवीच्या सोने, चांदी व हिरेजडीत दागिन्यांची स्वच्छता : करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात जय्यत तयारी सुरू असून, काल शनिवारी देवीच्या नित्य आणि उत्सव काळातील चांदीच्या दागिन्यांची तर आज रविवारी देवीच्या मौल्यवान हिरेजडित सोन्याच्या दागिन्यांची स्वच्छता करण्यात आली आहे.



# भ्रष्टाचारासाठी मंत्री रविंद्र चव्हाणांना अधिकाऱ्याची ऑफर

## आ. वैभव नाईकांनी उडवली खळबळ

**प्रतिनिधी**
■ **मालवण**

जिल्हा परिषद प्रशासनातील एका अधिकाऱ्याने दर महिन्याला १० कोटी रुपये मिळवून देण्याची खुली ऑफर पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांना दिल्याचा खळबळजनक गौप्यस्फोट त्यांनी केला आहे. पालकमंत्री पदाचा कारभार घेतल्यानंतर त्या अधिकाऱ्याची बदली करून त्याचे दुकान बंद केल्याचे रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. त्यावरून याआधीचे पालकमंत्री नारायण राणे, पालकमंत्री दीपक केसरकर, आणि पालकमंत्री उदय सामंत यांनी त्या अधिकाऱ्याचे दुकान सुरु ठेवले होते. आणि त्यांच्या कार्यकाळात कोट्यावधींचा भ्रष्टाचार झाल्याचा अप्रत्यक्ष आरोप रविंद्र चव्हाण यांनी याआधीच्या पालकमंत्र्यांवर केला आहे. त्यामुळे रविंद्र यांनी भ्रष्टचाराचा चेंडू आता तत्कालीन पालकमंत्र्यांच्या दिशेने टोलावला आहे. मात्र, रवींद्र चव्हाण यांच्या कार्यकाळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकोट येथील





पुतळ्यात आणि नौदल दिनानिमित्त जिल्हानियोजन मधून खर्च झालेल्या निधीत भ्रष्टाचार झाला त्याचे काय? असा सवाल आमदार वैभव नाईक यांनी केला आहे.

आमदार वैभव नाईक पुढे म्हणाले, जर संविधानिक पदावर असलेल्या पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांना जर एखादा अधिकारी ऑफर देत असेल तर त्या अधिकाऱ्याची केवळ बदली करण्यापेक्षा त्याच्यावर गुन्हा दाखल करून त्या अधिकाऱ्याला निलंबित का केले नाही? त्या अधिकाऱ्याचे दुकान सुरु ठेवणारे तत्कालीन पालकमंत्री आता सत्तेत असल्यामुळे अधिकाऱ्यावर कारवाई टळली का? त्या अधिकाऱ्याला पाठीशी घालून रविंद्र चव्हाण यांनी अप्रत्यक्षरीत्या भ्रष्टाचाराला पाठिंबा देण्याचेच काम केले. प्रशासनाला लागलेली अशा अधिकाऱ्याची कीड समूळ नष्ट करणे गरजेचे होते. आताही वेळ गेलेली नाही त्या अधिकाऱ्याचे नाव रविंद्र चव्हाण यांनी जाहीर करून त्या अधिकाऱ्याची ईडी चौकशी लावली पाहिजे जेणेकरून भ्रष्टाचार उघड होऊन कोणकोणत्या पालकमंत्र्यांनी त्या अधिकाऱ्याकडून पैसे मिळवले हे जनतेसमोर येईल. माजी पालकमंत्री नारायण राणे, माजी पालकमंत्री दीपक केसरकर, आणि माजी पालकमंत्री उदय सामंत हे सध्या विद्यमान पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्यासमवेत सत्तेत आहेत. रविंद्र चव्हाण यांनी केलेल्या गौप्यस्फोटामुळे तत्कालीन पालकमंत्र्यांच्या काळात भ्रष्टाचार झाल्याचे सिद्ध होते. अशा भ्रष्टाचारामुळेच सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विकास खुंटला आहे. केवळ ठेकेदारांच्या सोयीची कामे मंजूर करण्यावर भर दिला जातो. लोकांचे प्रश्न सोडविले जात नाहीत, जनतेला न्याय मिळत नाही म्हणून जनता दरबारात प्रश्नांची सरबत्ती होते.

पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी पुतळ्याची जबाबदारी आपली नसून नौदलाची आहे. असे त्यांचे म्हणणे असेल तर पुतळ्याच्या कामाची आणि परिसर सुशोभीकरणाची गुणवत्ता का तपासली गेली नाही? ती जबाबदारी पालकमंत्री म्हणून त्यांची नव्हती का? जर यात त्याचा आणि त्यांच्या विभागाचा संबंध नव्हता तर पोलीस स्टेशनमध्ये पालकमंत्र्यांनी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तक्रार का केली. ती तक्रार नौदल अधिकाऱ्यांकडून का करण्यात आली नाही? कोणत्या आधारावर आणि कोणत्या अनुभवावर २४ वर्षीय जयदीप आपटेला पुतळ्याचे काम देण्यात आले. राणेंसोबत जयदीप आपटेचे फोटो आहेत त्यामुळे त्यांच्या शिफारशीनुसार पुतळ्याचे काम देण्यात आले का? त्याचबरोबर पुतळा कोसळण्याच्या संवेदनशील विषयात पोलिसांनी केलेली कारवाई जनतेसमोर का आणली नाही? हे सर्व गुप्त ठेवून कोणाला वाचविण्याच्या प्रयत्न होत आहे असे अनेक प्रश्न माझ्याच नव्हे तर प्रत्येक शिवप्रेमींच्या मनात आहेत. पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार झाला हे आता समितीच्या अहवालात देखील उघड झाले आहे.

# वडीलधाऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण आणण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना - मुख्यमंत्री शिंदे

**प्रतिनिधी**
■ **कोल्हापूर**

आपली वडीलधारी मंडळी ही आपली संपत्ती असून आजवर त्यांनी कष्ट उपसले आहेत. त्यांचे अनुभव, ज्ञान ही आपल्यासाठी मोठी शिदोरी आहे. त्यामुळं त्यांच्या आयुष्यात आनंद, समाधानाचे क्षण आणण्याची जबाबदारी आपलीच आहे. याच भावनेतून आपण राज्यातील सर्व धर्मियांतील ६० वर्षांवरील ज्येष्ठांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु केल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ई-संदेशाद्वारे सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'चा राज्यस्तरीय ई- शुभारंभ पार पडला.



यावेळी कोल्हापूर येथे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी हिरवा झेंडा दाखवून विशेष रेल गाडी रवाना झाली. ८०० तीर्थयात्री दर्शनासाठी विशेष गाडीने मार्गस्थ झाले. यावेळी खासदार धैर्यशील माने उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे शुभेच्छा संदेशाद्वारे म्हणाले की, या योजनेचा शुभारंभ दक्षिण काशी आई अंबाबाईच्या करवीर येथून होत असल्याचा मनापासून आनंद होत आहे. त्यांनी आई अंबाबाईच्या चरणी नतमस्तक होऊन सामाजिक क्रांतिचे प्रणेते राजर्षी शाहू महाराजांनाही विनम्र अभिवादन केले. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेतील पहिली विशेष गाडी आयोध्येसाठी रवाना होते आहे. प्रभू श्री रामांचे दर्शन घेण्याचं संधी या यात्रेच्या शुभारंभाच्या निमित्ताने यात्रेकरूंना मिळतेय, त्यामुळे दक्षिण काशी कोल्हापूर ते प्रभू श्री रामांची जन्मभूमी आयोध्या या तीर्थयात्रेत सहभागी होणाऱ्या सर्व ज्येष्ठांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा. यासाठी जिल्हास्तरावर समित्या स्थापन केल्या आहेत. निवड झालेल्या लाभार्थ्यांचा प्रवास, निवास, भोजन खर्च करण्यात येणार आहे. भारतातील 73 आणि आपल्या राज्यातील 66 तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश असून पारदर्शक आणि ऑनलाईन पद्धतीने राबवण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्ह्याने या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेच्या शुभारंभाचा मान पटकावल्याचे सांगून मंत्री मुश्रीफ यांचे या शुभारंभाच्या निमित्ताने अभिनंदन केले.

## महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यास ऑफिसमध्ये मारहाण

**लातूर :** शेतकरी आणि महावितरण यांचा सातत्याने संबंध येत असतो, कारण शेतीसाठी वीज हा अनिवार्य घटक बनला आहे. त्यामुळे, वीजेच्या अडचणीसंदर्भाने शेतकरी महावितरण कार्यालयात खेटे मारतात, अनेकदा त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केवळ आश्वासन दिलं जातं. पण, प्रत्यक्ष काम केलं जात नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचा संयम सुटून ते अरेरावी किंवा मारहाण करतात. तर, कधी शेतकरी देखील आपल्या कामासाठी अडून बसतात आणि वाद घालतात. आता, लातूर जिल्ह्यातील हाडोळती येथील महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यास मारहाण केल्याची घटना घडली आहे. आजच्या तारखेत शेतातलं काम कर, अन्यथा मार खाशील असं म्हणत शेतकऱ्यांना मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. लातूर जिल्ह्यातील शेतकरी आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांमधील हा संवाद आणि मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हिडिओ व्हायरल झाला आहे. मारहाण करणाऱ्या विरोधात अहमदपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आलाय. अहमदपूर तालुक्यातील हाडोळती येथील महावितरणच्या कार्यालयातील कनिष्ठ अभियंता यांना झालेल्या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून नेटीझन्स आपल्या आपल्या परीने त्यावर कमेंट करत आहेत.

# लाडकी बहीण नव्हे लाडकी खुर्ची योजना, तीनही भाऊ लबाड

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

राज्यात महिलांसाठी सुरू करण्यात आलेली लाडकी बहीण ही योजना नाही तर ती लाडकी खुर्ची योजना आहे. १ कोटी १३ लाख ३२३ महिलांना याचा लाभ मिळणार असून ५ कोटी महिला मात्र वंचित राहणार आहेत. देवा भाऊ, नाथ एकनाथ, दादा असे तिघेही या योजनेचे श्रेय घेत असले तिन्ही भाऊ लबाड आहेत. अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी केली.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्व विदर्भातील पदाधिकाऱ्याच्या बैठकीच्या निमित्ताने भास्कर



जाधव नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारने महिला, शेतकरी आणि युवकांसाठी विविध योजना जाहीर केल्या तरी सर्व योजनाचा त्यांना निवडणुकीत काहीच फायदा होणार नाही. जनतेचा त्यांच्यावर विश्वास नाही. हे तीनही भाऊ लबाड आहे. बहिणी यांना भाऊ मानायला तयार नाहीत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव होणार हे निश्चित असल्याचे जाधव म्हणाले.

विदर्भाचा संपर्क नेता म्हणून निवड झाल्यानंतर जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्यासाठी विदर्भातील विविध जिल्ह्यात पदाधिकाऱ्यांचा बैठकी घेत आहे. विदर्भातून कुठले उमेदवार द्यावे याबाबत चर्चा करुन चाचपणी केली जात आहे.

# केसरकरांच्या स्वार्थामुळे सामान्य कार्यकर्त्यांचे नुकसान

**प्रतिनिधी**
■ **सावंतवाडी**

मंत्री दीपक केसरकर यांनी आपल्या स्वार्थासाठी वारंवार पक्ष बदलून आपला राजकीय फायदा केला. परंतु त्यांच्यासमवेत कायम राहणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे त्यात नुकसान झाले, अशी टीका आज येथे आयोजित पत्रकार परिषदेत सावंतवाडीचे माजी नगराध्यक्ष बबन साळगावकर यांनी केली. दरम्यान स्वर्गीय आनंद दिघे यांच्या जीवनपटावर दाखवण्यात आलेल्या धर्मवीर-2 या सिनेमांमध्ये चुकीच्या पद्धतीने दिघे यांची भूमिका दाखवली आहे. शिवसेनेशी गद्दारी करा, असे त्यांनी कधीही सांगितले





नसते आणि तशी वेळ आली असती तर संबंधितावर त्यांनी गोळया झाडल्या असत्या, असे ते म्हणाले.

साळगावकर यांनी आज या ठिकाणी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, मंत्री दीपक केसरकर यांनी आपल्या स्वार्थासाठी वेगवेगळ्या पक्षात प्रवेश केला. शिवसेनेत मंत्री पद मिळाल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यामुळेच मला मंत्रिपद मिळाले, असा त्यांनी दावा केला. परंतु त्या पक्षातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

राष्ट्रवादीचे नेते शरद पवार सुद्धा त्यांच्या टिकेतून सुटले नाही अशा अवस्थेत त्यांनी आपला स्वार्थ साधला. परंतु सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे नुकसान झाले. येणाऱ्या विधानसभेत मी नक्कीच प्रचाराच्या मैदानात उतरणार आहे आणि विरोधकावर तोफ डागणार आहे. आगामी विधानसभेत महाविकास आघाडी सत्तेत येईल, असा त्याला त्यांनी दावा केला. ते पुढे म्हणाले, काल आपण स्वर्गीय आनंद दिघे यांच्या जीवनावर आधारित धर्मवीर-2 हा सिनेमा बघितला. परंतु आनंद दिघे यांनी चुकीचे मार्गदर्शन केले, असे त्यात दाखवले आहे. त्यांनी कधीही गद्दारी सहन केली नसती आणि तसा प्रयत्न झाला असता तर संबंधितांना गोळ्या झाल्या असत्या, असेही ते म्हणाले.

# पिण्याच्या पाण्यातून 200 जणांना विषबाधा

**प्रतिनिधी**
■ **नांदेड**

नांदेड शहराजवळ असलेल्या नेरली कुष्ठधाम या गावात दोनशेहून अधिक जणांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पिण्याच्या पाण्यामुळं ही विषबाधा झाल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलीय. तर विषबाधा झालेल्या नागरिकांना तातडीनं रुग्णालयात भरती करण्यात आलं आहे.

गावातील सार्वजनिक पाणी पुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीतील पाणी प्यायल्यानं गावकऱ्यांना उलट्यासह चक्कर आणि डोकेदुखी होऊ लागली. हळू-हळू हा त्रास वाढत गेला. मोठ्या संख्येनं रुग्णसंख्येत वाढ



होत असल्यानं मिळेल त्या वाहनानं रुग्णांना शासकीय आणि खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. रात्रीतून दोनशेहून अधिक जणांना विषबाधा झाली. आज (28 सप्टेंबर) सकाळपासून देखील अनेकांना असाच त्रास होत असल्याचं बघायला मिळतंय. त्यांची तपासणीकरुन उपचार सुरू करण्यात आले आहेत.

वाढत्या रुग्णसंख्येमुळं गावात आरोग्य पथक तळ ठोकून आहे. आलेल्या रुग्णांची तपासणी करुन त्यांच्यावर तत्काळ उपचार केले जात आहेत. तर जास्त त्रास असलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात पाठवलं जातंय. सार्वजानिक टाकीतील पाणी दूषित असल्यानं हा प्रकार घडल्याचं डॉक्टरांनी सांगितलंय. दरम्यान, आरोग्य विभागानं पाण्याचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहे.

## अल्पवयीन मुलीची आत्महत्या, शिक्षक आणि पोलिसाने मारहाण केल्याचा आरोप

■ **संभाजीनगर**

छत्रपती संभाजीनगरमधील करमाड परिसरात १६ वर्षीय शाळकरी विद्यार्थ्याने आत्महत्या केल्यानं एकच खळबळ उडाली आहे. आत्महत्या केलेल्या मुलाच्या कुटुंबीयांनी करमाड पोलीस ठाण्यात ठिय्या दिला असून, मुलाला आत्महत्येसाठी प्रवृत्त करणाऱ्या पोलीस कर्मचारी आणि शिक्षकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. करण भाऊसाहेब पोफळे असं या मुलाचं नाव असून, तो गेले तीन दिवस बेपत्ता होता. शेतात त्याचा मृतदेह आढळून आल्यानंतर संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी जालना रस्त्यावर आंदोलन केलं. मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यास मृत मुलाच्या वडिलांनी नकार दिल्यावर पोलिसांनी मध्यस्ती करून समजूत काढली. मात्र दोषींवर कारवाई करण्याची मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

# जामनेरला मुक्कामी राहून, मला पाडून दाखवा

## गिरीश महाजनांचं एकनाथ खडसेंना आव्हान

**प्रतिनिधी**
■ **जळगाव**

विधानसभा निवडणूक लागण्यापूर्वीच जळगाव जिल्ह्यातील जामनेर विधानसभा मतदारसंघात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आणि माजी मंत्री एकनाथ खडसे हे आमने-सामने आले आहेत. काही दिवसांपूर्वी एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांच्यावर घणाघाती आरोप केले होते. त्याला आता गिरीश महाजन यांनी प्रत्युत्तर देत 'मला पाडून दाखवा' असं ओपन चॅलेंज दिलंय. ते जामनेरमध्ये बोलत होते.

भाजपा जामनेर विधानसभा मतदारसंघाची विस्तृत बैठक .यावेळी बोलत असताना गिरीश महाजन म्हणाले, "सर्व ठिकाणी





मी-मी करणाऱ्या एकनाथ खडसे यांच्या तालुक्यातील कोथळी ग्रामपंचायतसुद्धा त्यांना जिंकता आलेली नाही. त्यामुळं त्यांनी बाकीच्या गोष्टींवर बोलू नये. एकनाथ खडसे म्हणतात की मी जामनेर तालुक्यात हे धरण केलं ते धरण केलं, मग स्वतःच्या मतदारसंघातील बोदवड गावात महिना महिनाभर पाणी येत नसून मोठी पाणी टंचाई दूर करा, नंतर विकासाबाबत बोला. खडसेंना जर मला पाडायचं असेल तर तुम्ही इथं मुक्कामी राहून पाडून दाखवा. केवळ काहीतरी बोलायचं म्हणून बोलतात. एकनाथ खडसे इतकेच खरे असतील तर त्यांची आणि माझी नार्को टेस्ट करावी", असं महाजन म्हणाले.

# 'इंडिया बूक ऑफ रेकॉर्ड'ने घेतली पराडकरांच्या लेखनाची दखल

## 'कोकण' या एकाच विषयावर सलग आठ पुस्तकं, चपराक प्रकाशनची निर्मिती

**प्रतिनिधी**
■ **संगमेश्वर**

एक लेखक, एक विषय आणि एकच प्रकाशक मिळून सलग आठ पुस्तकं प्रकाशित करणाऱ्या पुणे येथील चपराक प्रकाशन आणि संपादक घनश्याम पाटील यांनी प्रकाशित केलेल्या कोकणच्या रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथील लेखक जे. डी. पराडकर यांच्या लेखन विक्रमाची ' इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड ' मध्ये नोंद झाली आहे. या लेखन विक्रमाबद्दल चपराक प्रकाशनचे घनश्याम पाटील आणि लेखक जे. डी. पराडकर यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

जे. डी. पराडकर हे गेली ३२ वर्षे विविध विषयांवर लेखन करत आहेत. यामध्ये प्रामुख्याने कोकणचे पर्यावरण, पर्यटन, गड किल्ले , ऐतिहासिक स्थळे, पुरातन मंदिरे, व्यक्तिमत्वे यांचा समावेश आहे. आजवर त्यांचे एक हजार पेक्षा अधिक लेख प्रसिद्ध झाले आहेत. कोकणवर सातत्याने लेखन करणाऱ्या पराडकर यांच्या लेखनाची दखल प्रथम 'कालनिर्णय'चे संचालक जयेंद्र साळगांवकर यांनी घेतली. पुस्तक रूपाने हे लेखन सर्व वाचकांसमोर




यावे, या उद्देशाने साळगांवकर यांनी पुणे येथील चपराक प्रकाशनचे संपादक त्यांचे मित्र घनश्याम पाटील यांच्याकडे पराडकर यांच्या लेखनाची शिफारस केली. जे. डी. पराडकर यांनी चपराक प्रकाशनमध्ये जावून घनश्याम पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेतली. यावेळी पाटील यांनी , कोकणवरील आपले सर्व लेखन आवडल्याचे नमूद केले. आपले एकच काय, तर कोकण वरील अनेक पुस्तके प्रकाशित करण्याचे आश्वासन घनश्याम पाटील यांनी या भेटीप्रसंगी दिले होते .

चपराक प्रकाशनने अल्पावधीतच जे. डी. पराडकर लिखित कोकण वरील 'साद निसर्गाची' हे पहिले पुस्तक प्रकाशित केले. त्यानंतर कसबा डायरी, असं जगावं कधीतरी, बारा सोनेरी पाने आणि डोंगरावरच्या कथा, अक्षर यात्रा , प्राजक्ताचे सडे, हळवा कोपरा आणि वेध अंतर्मनाचा अशी एकापाठोपाठ एक पुस्तके प्रकाशित करून पराडकर यांची कोकण या एकाच विषयावरील एकूण आठ पुस्तके प्रकाशित केली. या पुस्तकांची कालनिर्णयचे संचालक जयेंद्र साळगांवकर, चपराकचे घनश्याम पाटील, ज्येष्ठ पत्रकार शिरीष दामले, अभिनेते प्रशांत दामले, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ सदस्य, कवी आणि समुपदेशक प्रसाद कुलकर्णी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, अभिनेते सतीश सलागरे, गायिका आणि निवेदिका दीप्ती गद्रे, युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक ऐश्वर्य पाटेकर यांनी या सर्व पुस्तकांची पाठराखण केली असून स्वतः घनश्याम पाटील, शिक्षण तज्ञ, लेखक संदीप वाकचौरे, साताऱ्याचे शिक्षणाधिकारी, लेखक रवींद्र खंदारे, प्रसिद्ध लेखक समीर बापू गायकवाड, सुप्रसिद्ध साहित्यिक आणि शिक्षणतज्ञ डॉ. न. म. जोशी, अरुण कमळापूरकर , आकार डी जी नाईन या यूट्यूब चॅनलचे संचालक प्रभाकर सूर्यवंशी अशा दिग्गज मंडळींनी या पुस्तकांच्या प्रस्तावना लिहील्या आहेत.

एका वर्षात सलग ०१ हजार १९२ पाने लिहिण्याचा विक्रम लेखक जे. डी. पराडकर यांनी केला. एकाच लेखकाची, कोकण या एकाच विषयावर सलग आठ पुस्तके प्रकाशित करण्याचा विक्रम चपराक प्रकाशन पुणे , संपादक घनश्याम पाटील यांनी केला. इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने सर्व पुस्तकांचे आयएसबीएन नंबर तपासले, पुस्तकांच्या हार्ड कॉपी आपल्याकडे मागवून घेतल्या. याबाबतचे प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, ओळखपत्र, मेडल आदि जे पराडकर यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. या विक्रमाबद्दल 'चपराक'चे घनश्याम पाटील, लेखक जे. डी. पराडकर यांचे विविध मान्यवर लेखक, सामाजिक संस्था, मान्यवर मंडळी आदींनी अभिनंदन केले आहे.

> **या विक्रमाचे हक्कदार आपले मार्गदर्शक !**
>
> *लेखन प्रवास सुरू करण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार शिरीष दामले यांनी आपल्याला वेळोवेळी मार्गदर्शन केले. वेगळ्या पद्धतीच्या लेखनाला सुरुवात केल्यानंतर वाचकांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. कालनिर्णयचे संचालक जयेंद्र साळगांवकर यांनी चपराक प्रकाशनकडे माझ्या लेखनाची शिफारस केली. चपराक प्रकाशन, संपादक घनश्याम पाटील आणि ज्योती पाटील यांनी एका वेगळ्या ध्येयाने प्रेरित होत माझ्या लेखनाला न्याय दिला. विविध मान्यवरांनी पुस्तकाची पाठराखण करत प्रस्तावना दिल्या. चित्रकार विष्णू परीट , हेमंत सावंत यांनी पुस्तकांची अप्रतिम अशी मुखपृष्ठे केली. त्यामुळे या विक्रमाचे हक्कदार हे सर्व मान्यवर आहेत.*
>
> **- जे. डी. पराडकर , लेखक संगमेश्वर**

# बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाला सुरुवात

## रिपब्लिकन पक्ष मजबूत करण्याचा संकल्प

**प्रतिनिधी**
■ **नागपूर**

रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक सरचिटणीस तसेच राज्यसभेचे माजी उपसभापती दिवंगत नेते बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी वर्षात रिपब्लिकन पक्ष मजबूत करण्याचा संकल्प करत आहोत असे सांगून रिपब्लिकन पक्ष ( खोरिपा) राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार उपेंद्र शेंडे यांनी नागपूर येथे हिंदी मोरभवन मध्ये बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी सोहळयाचा प्रारंभ करण्यात आला त्यावेळी अध्यक्ष म्हणून उपेंद्र शेंडे बोलत होते

काही लोक रिपब्लिकन पक्ष संपविण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र उपेंद्र शेंडे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही प्रामाणिक, निष्ठावंत कार्यकर्ते जिद्दीने रिपब्लिकन पक्ष मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहोत असे पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते मा डॉ एन व्ही ढोके यांनी आपल्या भाषणात सांगितले. तर राष्ट्रीय संघटक सचिव उत्तमराव गवई यांनी सुद्धा रिपब्लिकन पक्ष आणि बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जीवनावर परखडपणे विचार




मांडले पक्षाचे. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भाऊ निरभवणे यांनी सांगितले की, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी आयुष्यभर काँग्रेस विरोधात काम केले आहे असे असताना यावेळी लोकसभा निवडणुकीत संविधान आणि लोकशाही वाचविण्यासाठी रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) ने महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता. आता त्यांनी आमच्या बरोबर सन्मानपूर्वक जागा वाटप करावे तशी चर्चा करावी नाही तरच आम्ही रिपब्लिकन पक्षाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी स्वबळावर विधानसभा निवडणुका लढविण्याचा निर्णय घेऊ शकतो.

यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष माजी प्राचार्य डॉ गोपीचंद मेश्राम, राष्ट्रीय सहप्रवक्ते प्रशिक आनंद, जेष्ठ नेते पंजाबराव रामटेके, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस जीवन बागडे, चिटणीस प्रा अशोक ढोले, कार्याध्यक्ष डॉ देवेश कांबळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष भागवत कांबळे, वर्धा जिल्हा अध्यक्ष विनायकराव ताकसांडे , अतुल खोब्रागडे, आदी मान्यवरांनी बैरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जीवनावर विचार मांडले सुत्रसंचलन विदर्भ प्रदेश अध्यक्ष सी पी रामटेके यांनी केले तर प्रास्ताविक नागपूर प्रदेश अध्यक्ष राजू भाऊ गजभिये यांनी केले आभार प्रदर्शन प्रशांत डांगे यांनी केले. यावेळी गोपाळराव खोब्रागडे, भिमराव चौरे, विनोद साळवी सरदार कर्नेलसिंग दिघवा, विक्रांत पाटील, दिगंबर वाकोडे, सिद्धार्थ रामटेके, आनंद वानखेडे, सुरेश दहिकर, अरूण कांबळे,प्रकाश तारू आदी प्रमुख पदाधिकारी राज्याच्या उपस्थित होते.

## कुस्तीत स्नेहाचे नेत्रदिपक यश

**मुंबई :** बृहन्मुंबई महापालिका - शारीरिक शिक्षण विभाग आयोजित उपविभाग शारीरिक शिक्षण माध्यमिक विभाग अंतिम कुस्ती स्पर्धा २०२४-२५ वर्षा नगर म.न.पा शाळा विक्रोळी या ठिकाणी संपन्न झाली. या स्पर्धेत मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या सौजन्याने व मिरा भाईंदर कुस्तीगीर संघ संचालित श्री गणेश आखाड्यामध्ये सराव करणारी . स्नेहा रामदिन मल्ला हिने १७ वर्षा आतील ४० किलो वजनी गटामध्ये परीमंडळीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे . तिला वस्ताद वसंतराव पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.श्री गणेश आखड्यातर्फे स्नेहाचे खास अभिनंदन केले आहे.



# मुंबईकर ज्येष्ठाची आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत 3 सुवर्णपदकांची कमाई




प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईच्या आयईएस ओरायन शाळेच्या ६ वर्षीय कु. ज्येष्ठा पवार हिने थायलंड येथे नुकत्याच पार पडलेल्या एन्ड्युरन्स इण्टरनॅशनल स्केटिंग चॅम्पियनशिपमध्ये शानदार प्रदर्शन करीत ३ सुवर्णपदकांची लयलूट केली.

या स्पर्धेत भारतसह फिलीपीन्स, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ,इंडोनेशिया ,इजिप्त ,केनिया,थायलंड,सौदी अरेबिया ,मालदीवस,रवांडा या देशाचे स्केटिंगपटू सहभागी झाले होते. चिमुकल्या जेष्ठाच्या या पराक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दादर हिंदू कॉलनी येथील आयईएस ओरायन शाळेत पहिला वर्गात शिकणाऱ्या सहा वर्षीय कु. ज्येष्ठा शशांक पवार हिने हौस म्हणून स्केटिंगला सुरवात केली होती. तिची स्केटिंग मधील आवड पाहून पुढे स्पीड एक्स स्केटिंग अकादमी अकादमीत तिचा प्रवेश घेवून प्रशिक्षक मेहमूद सिद्धिकी यांच्या मार्गदर्शनाखाली तिन स्केटिंगचे प्रशिक्षण देण्यात आले. अल्पावधीतच ज्येष्ठा हिने जिल्हास्तरीय राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नेत्रदीपक यश मिळवले.

## मुंबई संघाला मोठा धक्का

# सर्फराजचा भाऊ मुशीर खान रस्ते अपघातात जखमी

### फ्रॅक्चर झाल्याने इराणी करंडक लढतीस मुकणार



वृत्तसंस्था
■ कानपुर

मुंबईचा स्टार युवा फलंदाज मुशीर खान रस्ता अपघातात गंभीर जखमी झाला आहे. लखनौला जात असताना त्याचा रस्ते अपघात झाला आणि त्यांना फ्रॅक्चर झाल्याचे सांगण्यात येत आहे. इराणी चषकापूर्वी मुंबई संघासाठी हा मोठा धक्का आहे. पण पोलिसांनी किंवा मुशीरच्या कुटुंबियांनी याबाबत अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

मुशीर आपल्या वडिलांसोबत कानपूरहून लखनौला जात असताना रस्ता अपघात झाला, ज्यामुळे इराणी कप स्पर्धेतून बाहेर पडण्याची शक्यता आहे. मुशीर खानचा अपघात नेमका कसा झाला आणि त्याच्या दुखापतीबाबत अधिक माहिती मिळालेली नाही. मुशीरच्या या अपघातातील दुखापतीमुळे इराणी कपच्या पहिल्या सामन्याला तो मुकण्याची शक्यता आहे. मुशीरची अनुपस्थिती मुंबईसाठीही मोठा धक्का आहे, कारण १९ वर्षीय मुशीर भन्नाट फॉर्मात होता. लखनौ येथील भारतरत्न श्री अटलबिहारी वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियमवर १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान रेस्ट ऑफ इंडिया वि मुंबई हा खेळवला जाईल. ११ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या रणजी ट्रॉफीच्या काही सामन्यांमध्येही मुशीर न खेळण्याची शक्यता आहे.

मुशीर इराणी चषकासाठी मुंबईच्या संघासोबत लखनौला आला नव्हता. हा अपघात घडला तेव्हा तो कदाचित त्याच्या मूळ गावी आझमगडहून त्याच्या वडिलांसोबत लखनौला जात होता, त्यावेळी हा अपघात घडला," अशी माहिती टाईम्स ऑफ इंडियाच्या सूत्रांनी दिली आहे. अपघाताबाबत मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही, परंतु निवडसमिती लवकरच जखमी फलंदाजाच्या बदलीची घोषणा करतील, असे म्हटले जात आहे.

नऊ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये त्याने ५१.१४ च्या सरासरीने ७१६ धावा केल्या आहेत ज्यात तीन शतके आणि एक अर्धशतक आहे. त्याने आठ विकेट्स घेतल्या आहेत. मुशीरने बंगळुरू येथे भारत अ विरुद्ध दुलीप ट्रॉफी पदार्पण करताना शानदार १८१ धावा केल्या. अंडर-19 विश्वचषकात तो अव्वल कामगिरी करणाऱ्या खेळाडूंमध्ये होता. मागील रणजी ट्रॉफी हंगामात, मुशीर खानने बडोद्याविरुद्ध उपांत्यपूर्व फेरीत नाबाद २०३ आणि विदर्भाविरुद्धच्या अंतिम सामन्यात १३६ धावा केल्या होत्या.

**इराणी कपसाठी संघ रेस्ट ऑफ इंडिया:**
*ऋतुराज गायकवाड (कर्णधार), अभिमन्यू इश्वरन (उपकर्णधार), साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), मानव सुथार, सारांश जैन, प्रसीद कृष्णा, मुकेश कुमार, यश दयाल , रिकी भुई, शाश्वत रावत, खलील अहमद, राहुल चहर.*
**मुंबई:**
*अजिंक्य रहाणे (कर्णधार), पृथ्वी शॉ, आयुष म्हात्रे, मुशीर खान, श्रेयस अय्यर, सिद्धेश लाड, सूर्यांश शेडगे, हार्दिक तामोरे (यष्टीरक्षक), सिद्धांत अधतराव, शम्स मुलानी, तनुष कोटियन, हिमांशू सिंग, शार्दुल थवा, शार्दुल ठाकूर, मोहम्मद जुनैद खान, रॉयस्टन डायस.*

# इंग्लंडने कांगारूंना पराभूत करत 49 वर्षांनी रचला इतिहास

### यजमानांनी केले 'वन डे' मालिकेत 'कमबॅक', मालिकेत २-२ बरोबरी



वृत्तसंस्था
■ लॉर्ड्स

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया संघांत सुरु असलेल्या पाच सामन्यांच्या वन-डे मालिकेमध्ये इंग्लंड संघाने कमबॅक केले आहे. सुरूवातीचे दोन सामने गमावल्यावर इंग्लंड संघाने मुसंडी मारली आहे. तिसऱ्या आणि चौथ्या वन-डे सामन्यात सलग विजय मिळवला. शुक्रवारी झालेल्या चौथ्या वन-डे सामन्यामध्ये 186 धावांनी विजय मिळवला. या विजयासह इंग्लंडने मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. लॉर्ड्स मैदानावर मिळवलेला विजय खास असण्याचं कारण म्हणजे हा या मैदानावरील हा दुसरा सर्वात मोठा विजय आहे. 49 वर्षांनी इंग्लंडने कर्णधार हॅरी ब्रूक याच्या नेतृत्वात खेळताना हा विक्रम नोंदवला आहे. तर पराभूत झालेल्या ऑस्ट्रेलिया संघाचा वन-डे क्रिकेटमधील चौथा मोठा पराभव आहे.

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या चौथ्या वन-डे मध्ये इंग्लंड संघाने पहिल्यांदा बॅटींग करताना 312-5 धावा केल्या होत्या. यामध्ये कर्णधार हॅरी ब्रूकने 11 चौकार 1 षटकारांच्या मदतीने सर्वाधिक 87 धावा केल्या. बेन डकेट याने 62 धावा केल्या, तर इंग्लंडला तीनशे धावांचा टप्पा ओलांडून देण्यात लियाम लिव्हिंगस्टोन याची महत्त्वाची भूमिका राहिली. मैदानात आल्यावर त्याने चौफेर फटकेबाजी केली. अवघ्या 27 चेंडूत 62 धावांची दमदार खेळी केली. यामध्ये 07 षटकार आणि 03 तीन चौकार मारले. विशेष म्हणजे ऑस्ट्रेलियाचा स्टार खेळाडू मिचेल स्टार्क याच्या शेवटच्या ओव्हरमध्ये त्याने तब्बल 28 धावा कुटल्या. वन डे मध्ये एका ओव्हरमध्ये सर्वाधिक धावा देणारा ऑस्ट्रेलियाचा तो पहिला गोलंदाज ठरला आहे.

ऑस्ट्रेलियाला हरवत इंग्लंडने लॉर्ड्सवरील दुसरा सर्वात मोठा विजय मिळवला. याआधी 1975 च्या वर्ल्ड कपमध्ये इंग्लंडने भारतीय संघाचा 202 धावांनी पराभव केला होता. त्यानंतर म्हणजेचआता 49 वर्षांनी इंग्लंडने दुसरा मोठा विजय मिळवला आहे. याआधी 2003 मध्ये इंग्लंडसंघासमोर दक्षिण आफ्रिकेचा संघ 107 धावांवर ऑलआऊट झाला होता. त्यासोबतच ऑस्ट्रेलिया संघाचा वन डे क्रिकेटमधील चौथा मोठा पराभव झाला. ऑस्ट्रेलियाचा वनडेतील सर्वात मोठा पराभव 2018 मध्ये नॉटिंगहॅममध्ये 242 धावांनी इंग्लंडविरुद्ध झालाय. 1986 मध्ये ॲडलेडमध्ये न्यूझीलंडकडून 206 धावांनी, 2006 मध्ये केपटाऊनमध्ये दक्षिण आफ्रिकेकडून 196 धावांनी, आता लॉर्ड्सवर इंग्लंडने 186 धावांनी पराभव झालाय.

# पालिका माध्यमिक शाळांच्या कुस्ती स्पर्धा वर्षानगर मनपा शाळा विक्रोळी येथे संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांच्या कुस्ती स्पर्धांचे आयोजन 25 व 26 सप्टेंबर रोजी वर्षानगर शाळेत करण्यात आले होते प्रथम या स्पर्धांचे आयोजन 23/09/2024रोजी तीन परिमंडलात करण्यात आले होते. स्पर्धेत 17 वर्ष वयोगटात मुलगे 7 वजनी गट व मुलींचे 5 वयोगट होते. परिमंडळात प्रत्येक वजनी गटातील प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकने विजयी झालेले 84 मुलगे व 60 मुली अंतिम स्पर्धेत सहभागी झाले.

या स्पर्धेचे उद्घाटन श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा पुरस्कार विजेते आनंदा गायकवाड यांचे हस्ते झाले.या वेळी शिक्षणतज्ज्ञ चंद्रवीर बंशीधर यादव आणि महापौर पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक भाऊ साहेब आहेर उपस्थित होते.



स्पर्धांचा बक्षिस वितरण समारंभास उपशिक्षणाधिकारी किर्ती वर्धन किरतकुडवे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ पर्यवेक्षक राजेश गाडगे यांनी केले. अतिथींच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना मेडल, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महापालिकेचे विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात ,उपक्रमांत सहभागी होतात यश मिळवतात. मनपाचे शिक्षक खऱ्या अर्थाने मनपाच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी मेहनत घेतात.मुंबई मनपाचे खेळाडु जिल्हा राज्य, राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल यश संपादित करीत आहेत .याबद्दल मनपाच्या शा शि शिक्षकांचे त्यांनी कौतुक केले. व विजयी विदयार्थांच अभिनंदन केले .विज्ञान व तंत्रज्ञाच्या जगात खेळांच महत्त्व अधिकच वाढलं आहे नव्हे आवश्यक आहे. शरीर स्वास्थ्यासाठी प्रत्येकाने किमान एक खेळ खेळावा असे मनोगत त्यांनी सांगितले. कार्यक्रमास पर्यवेक्षक दत्तु लवटे व सर्व कनिष्ठ उपस्थित होते.

# 10 हजार लाडक्या बहिणींना भाजपा अल्पसंख्याक मोर्चातर्फे साड्या आणि सूट वाटप कार्यक्रम

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार

प्रतिनिधी
■ मुंबई

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा पखवाडा अंतर्गत भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष एस.एम.खान यांच्या मार्फत शनिवार दिनांक ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ओशिवरा मेट्रो स्थानकाजवळील म्हाडा मैदानावर आयोजित कार्यक्रमात १० हजार महिलांना मोफत साड्या आणि सूटचे वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमृता ताई फडणवीस आणि मुंबई भाजपचे अध्यक्ष ॲड आशिष शेलार उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश सरचिटणीस



संजय केणेकर, मुंबई सरचिटणीस संजय उपाध्याय, स्थानिक आमदार भारती ताई लवेकर, अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र अध्यक्ष इद्रेश मुलतानी, भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ, महाराष्ट्राचे माजी गृह राज्यमंत्री कृपाशंकर सिंह, महाराष्ट्र उपाध्यक्ष एजाज देशमुख, अल्पसंख्याक मोर्चाचे मुंबई अध्यक्ष वसीम खान या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. एसएम खान यांनी त्यांच्या जोगेश्वरी पश्चिम कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

# मोफत उपचारांचा रुग्ण हक्क संरक्षण कायदा करा, राज्य सरकारकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

आपल्याकडे बाललैंगिक अत्याचाराचा कायदा आहे, स्त्री सुरक्षिततेचा कायदा आहे, ॲट्रॉसिटी सारखा कायदा आहे, त्याच पद्धतीचा फौजदारी संहितेचा रुग्ण हक्क संरक्षण कायदा देखील झाला पाहिजे, ही रुग्ण हक्क परिषदेची आणि समस्त नागरिक व रुग्णांची गेल्या बारा वर्षापासूनची मागणी आहे. निवडणुका तोंडावर आलेल्या असताना राज्य सरकारने कुठलीही आश्वासने न देता रुग्ण हक्क संरक्षण कायदा पारित केला करावा. अशी मागणी रुग्ण हक्क परिषदेने काल पत्रकार परिषदेत.केली.

येत्या काळात रुग्ण हक्क संरक्षण कायदा पारित न केल्यास आचारसंहितेच्या काळात देखील रस्त्यावर उतरून राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. असा इशाराही परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण, यांनी दिला आहे. यावेळी मुख्य समन्वयक राजाभाऊ कदम, कामगार नेते रमेश मारुती जाधव, विश्वशांती सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रतीक कांबळे आणि परिषदेच्या संपर्कप्रमुख अपर्णा मारणे साठ्ये है उपस्थित होते.

गरीब व सर्वसामान्य रुग्णांचे रुग्णालयाचे येणारे सर्व बिल कोट्यावधी रुपये खर्च करणाऱ्या राज्य सरकारने भरले पाहिजे. महात्मा फुले जन आरोग्य योजना, मुख्यमंत्री सहायता निधी, प्रधानमंत्री सहाय्यता निधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपचार निधी नवी दिल्ली अशा प्रकारच्या सर्व योजनांचे एकत्रीकरण करून लोकांना किमान दहा लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत दिले पाहिजेत. रुग्णांच्या तब्येतीची प्रकृतीची हेळसांड करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध कडक कारवाई झाली पाहिजे. अशा पद्धतीची तरतूद या रुग्ण हक्क कायद्यात असली पाहिजे, ही देखील त्यांनी मागणी केली आहे.

# चांदिवलीत भाजपच्या सेवापखवाडा अंतर्गत रक्तदान शिबिरात 225 युनिट रक्त संकलन

प्रतिनिधी
■ मुंबई


देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विशेष आवाहनानुसार सेवा पखवाडा अंतर्गत भारतीय अल्पसंख्याक प्रतिष्ठान आणि अहिमसा विश्व भारती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच चांदिवली भाजप मंडळ आणि मुंबई अल्पसंख्यांक मोर्चाच्या विशेष सहकार्याने चांदिवली साकीनाका येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या रक्तदान शिबिरात 225 युनिट रक्त संकलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्या विश्व भारती अहिमसेचे संस्थापक रक्तदान, एकता आणि बंधुत्वाचा संदेश देण्यात समर्पित असलेले आचार्य डॉ. लोकेश




मुनीजी महाराज, राज्यसभा खासदार, चंडीगढ विद्यापीठाचे कुलपती आणि भारतीय अल्पसंख्याक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतनाम सिंह संधू, मुंबई भाजपचे महासचिव आणि महाराष्ट्र सरकारचे माजी मंत्री संजय उपाध्याय, चांदिवलीचे कार्यतत्पर आमदार दिलीप मामा लांडे, सामाजिक कार्यकर्ते अनिल गलगली, मुंबई भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष वसीम आर खान, चांदिवली मंडळाचे अध्यक्ष प्रकाश देवजी मोरे, उत्तर मध्य मुंबई जिल्हाचे उपाध्यक्ष शुभ्रांशू दीक्षित, माजी नगरसेवक सीताराम तिवारी, प्रभाग अध्यक्ष प्रशांत मौर्य, महेश चौगुले, युवा मोर्चाचे मंडल अध्यक्ष अभिषेक सिंह, उत्तर पश्चिम जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष हुसेन खान.पठाण, सामाजिक कार्यकर्ते संपत अण्णा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या रक्तदान शिबिरामध्ये भाजपा तालुका अध्यक्ष प्रकाश मोरे यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

# मध्य रेल्वेच्या मानव संसाधन विभागात प्रत्येक डेस्कवर अवतरणार निसर्ग



प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाच्या मानव संसाधन विभागाने शाश्वत आणि पर्यावरणपूरक कामाच्या वातावरणाला प्रोत्साहन देण्यासाठी एक उल्लेखनीय उपक्रम म्हणून, "परिवर्तनाची बीजे पेरणे" सुरू केले आहे. मुंबई विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक रजनीश कुमार गोयल यांनी उद्घाटन केलेल्या या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचा उद्देश प्रत्येक डेस्कवर निसर्ग आणणे, कर्मचाऱ्यांचे कल्याण वाढवणे आणि हिरवीगार कार्यक्षेत्र निर्माण करणे हा आहे. या कार्यक्रमाच्या शुभारंभा दरम्यान, ४५० कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यरत डेस्कवर ठेवण्यासाठी हे इनडोअर प्लांट प्रदान करण्यात आले आहेत.

उपक्रमांतर्गत, सर्व कर्मचारी सदस्यांना हवा शुद्ध करणारे गुणधर्म असलेली लहान कुंडीत रोपे दिली जातील. या वनस्पती, ज्यांना कमीतकमी काळजी आवश्यक आहे, ते पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देत असताना, तणाव कमी करणे, मूड वाढवणे आणि उत्पादकता वाढवणे अपेक्षित आहे.

मध्य रेल्वेने या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे, कामाच्या निरोगी वातावरणाचे महत्त्व ओळखून 'परिवर्तनाची बीजे पेरणे' हे अधिक टिकाऊ आणि कर्मचारी-अनुकूल कार्यस्थळ तयार करण्याच्या दिशेने एक छोटेसे पाऊल आहे. आम्हाला विश्वास आहे की या उपक्रमामुळे आमच्या कर्मचाऱ्यांचा केवळ फायदाच होणार नाही तर हिरवागार भविष्यासाठीही हातभार लागेल. असे महाव्यवस्थापक म्हणाले.

# महात्मा फुले यांच्या तत्वमूल्यांचा अंगिकार केल्याशिवाय जीवनात यशस्वी होणे अशक्य!

### गोविंदराव मोहिते यांचे समाजरत्न पुरस्कार सोहळ्यात प्रतिपादन.

प्रतिनिधी
■ मुंबई

सहजीवन,सहभोज न आणि सहशिक्षण ही महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्य शोधक चळवळीची मुलतत्वे होत. त्याचा अंगीकार केल्याशिवाय आज खऱ्या अर्थाने जीवनात यशस्वी होता येणार नाही,असे विचार महाराष्ट्र इंटक आणि राष्ट्रीय मिल मजदू संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी येथे सत्य शोधक समाजरत्न पुर स्कार स्वीकारताना व्यक्त केले.

दैनिक शिवनेर आणि सावता माळी ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने काल भायखळा येथील सावता माळी सभागृहात सत्यशोधक समाजाचा १५१ वा वर्धापन दिन सोहळा संपन्न झाला. त्यावेळी सत्यशोधक समाजरत्न पुरस्कार स्वीकारताना गोविंदराव मोहिते बोलत होते. सामारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार हरिभाऊ राठोड, मुंबई बँकेचे संचालक नंदकुमार काटकर, लेखक शंकर निकम



आदी शिक्षण,पत्रकारिता,सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. शिवनेर दैनिकाचे विद्यमान संपादक आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांच्या पुढाकाराने हा वर्धापन दिन सोहळा संपन्न झाला.

गोविंदराव मोहिते आपल्या सत्काराला उत्तर देताना पुढे असेही म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वीकारले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तर त्यांना आपले गुरु मानले,यातून महात्मा फुले यांचे थोर श्रेष्ठत्व लक्षात येते. आजच्या शिक्षण पद्धतीचे बाजारीकरण झाले आहे,अशी खंत व्यक्त करून गोविंदराव मोहिते म्हणाले,आपण शेवटच्या गिरणी कामगारांना घर मिळेपर्यंत गिरणी कामगार घरांच्या प्रश्नावर लढत राहणार आहोत.

माजी खासदार हरिभाऊ राठोड आपल्या भाषणात म्हणाले,महात्मा फुले यांच्या ग्रंथाची चिकित्सा झाली पाहिजे.त्यातून नवी जीवन मूल्य सांपडल्या शिवाय रहाणार नाहीत. लेखक शंकर निकम, नंदकुमार काटकर, ज्येष्ठ पत्रकार राही भिडे यांनीही आपल्या भाषणात महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीवर आपले विचार मांडले. या प्रसंगी महात्मा फुले यांच्या प्रमाणे, कामगार,पत्रकारिता,सहकार,लेखन आदी सार्वजनिक क्षेत्रात आयुष्य वाहून काम केलेल्या कामगार नेते गोविंदराव मोहिते यांच्यासह, ज्येष्ठ पत्रकार राही भिडे, संजय कदम, हेमंत महाडीक, किरण झोडगे, विश्वास दार्वेकर, दीपक म्हात्रे, दत्ता बाळसराफ,सदानंद खोपकर या ९ जणांना सत्यशोधक समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.तर पत्रकार, ज्येष्ठ कथा लेखक काशिनाथ माटल यांचा अमृतमहोत्सवी जन्म सोहळ्या निमित्त विशेष सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप स्मृती चिन्ह,शाल,श्रीफळ असे होते. हेमंत मंडलिक यांनी आभार मानले.

# मुंबईतील 1416 नर्सिंग होमला पालिकेचा झटका

### नोंदणी आणि नूतनीकरण शुल्कात अनेक पटींनी केली वाढ

■ मुंबई

मुंबईत सुरू असलेल्या शेकडो नर्सिंग होमला मुंबई महापालिकेने मोठा झटका दिला आहे. त्यांच्या नोंदणी आणि नूतनीकरण शुल्कात अनेक पटींनी वाढ केली आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आणि A+ श्रेणीची महानगरपालिका असल्याने येथील प्रत्येक नर्सिंग होमकडून 5000 रुपये शुल्क वसूल केले जाणार आहे. महापालिकेच्या स्थायी समितीने सन 2021 मध्ये नर्सिंग होमच्या शुल्कात वाढ करण्यास मान्यता दिली होती, मात्र महापालिका निवडणुकीमुळे त्याची अंमलबजावणी झाली नाही. आता महापालिकेची सत्ता महापालिका आयुक्तांकडे असल्याने प्रशासनाने वाढीव शुल्क वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महापालिकेच्या अधिकाऱ्याने सांगितले की, महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी नियम 1973 नुसार महापालिका एक ते पाच खाटांसाठी नर्सिंग होमकडून नोंदणी आणि नूतनीकरणासाठी 5000 रुपये शुल्क वसूल करेल. नोंदणी शुल्कासह नूतनीकरणासाठी 25 टक्के शुल्क आकारल्यास ही रक्कम 6250 रुपये आणि दुसऱ्या नूतनीकरणासाठी 7812.5 रुपये शुल्क आकारले जाईल. शुल्क आकारण्याचा हा नियम ३ वर्षांसाठी लागू राहणार आहे.

एक ते पाच खाटा असलेल्या नर्सिंग होमसाठी, राज्य सरकारने अ प्लस आणि अ वर्ग महानगरपालिकांना 5000 रुपये, ब वर्ग महानगरपालिकांना 4500 रुपये, अ वर्ग महानगरपालिकांना 4000 रुपये, ड वर्ग महानगरपालिकांना 3500 रुपये दिले आहेत. पंचायत आणि इतर ग्रामीण भागातील नर्सिंग होमसाठी परिषद आणि महानगरपालिकेने 3000 रुपये शुल्क निश्चित केले होते. यापूर्वी, मुंबईतील 10 खाटांच्या नर्सिंग होमसाठी नोंदणी शुल्क 300 रुपये होते. महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी नियमात बदल केल्यानंतर सन 2021 मध्ये नर्सिंग होमकडून वाढीव शुल्क वसूल करण्याच्या प्रस्तावाला महापालिकेच्या स्थायी समितीने मान्यता दिली होती.

# नरेंद्र मोदी गोहत्या एजंट झालेत...

**अंबिकापूर :** छत्तीसगडच्या अंबिकापूर येथील पुरी पीठाचे शंकराचार्य स्वामी निश्चलानंद सरस्वती म्हणाले की, गोरक्षणासाठी आलेले मोदी हे गोहत्येचे एजंट झाले आहेत. गोरक्षणाच्या नावाखाली पंतप्रधान झाले. पंतप्रधान झाल्यानंतर ते गोरक्षकांना गुंड म्हणतात. शंकराचार्य स्वामी निश्चलानंद म्हणाले की, ते पंतप्रधानपदापर्यंत पोहोचले, पण त्यांना मर्यादेचे ज्ञान राखत नाही. त्यांनी रामलल्लाच्या मूर्तीला अपमानास्पद रीतीने अभिषेक केला. या कारणाने त्यांची घसरणही होत आहे. राम जिथे गेले तिथे भाजपचा सफाया झाला. जय श्री राम म्हणायला विसरले. आधी मोदींची गॅरंटी म्हणायचे, आता नितीश-नायडूंच्या कुबड्यांवर. शंकराचार्य म्हणाले की, नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांना पंतप्रधानांनी गोहत्या थांबवावी, असे सांगितले होते. आता मोदी भारताचे पंतप्रधान आहेत. आता ते म्हणतात, गोरक्षक गुंड आहेत. जो पंतप्रधान होतो तो ख्रिश्चन आणि मुस्लिम समाजाचा गुलाम होतो.



# श्रीलंकेतून 37 तमिळ मच्छिमारांची सुटका करावी





वृत्तसंस्था
नवी दिल्ली

श्रीलंकेच्या नौदलाकडून वारंवार तामिळ मच्छिमारांवर कारवाई केली जात असल्याचे समोर आले आहे. अनेक तामिळ मच्छिमारांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, याच पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांना पत्र लिहिले असून श्रीलंकेच्या नौदलाकडून वारंवार पकडल्या जाणाऱ्या तामिळ मच्छिमारांची सुटका करण्याची मागणी केली आहे.

राहुल गांधी यांनी आपल्या पत्रात मच्छिमारांच्या सुटकेसाठी आणि जप्त केलेल्या बोटींसाठी परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांना श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांशी बोलण्यास सांगितले आहे. तसेच, 21 सप्टेंबर 2024 रोजी श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांनी 37 तमिळ मच्छिमारांना अटक केली. त्यांच्या बोटीही जप्त करण्यात आल्या आहेत. मायलादुथुराई येथील काँग्रेस खासदार आर सुधा यांनी मला या प्रकरणाची माहिती दिली, असे राहुल गांधींनी पत्रात म्हटले आहे.

अटक करण्यात आलेले मच्छिमार हे किनाऱ्याजवळ छोट्या प्रमाणात काम करतात. घटनेच्या दिवशी त्यांनी संकटात सापडलेल्या श्रीलंकेच्या बोटीला वाचवण्याचा प्रयत्न केला होता. मच्छिमारांनी बचाव मदतीसाठी श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्याचे सांगण्यात आले. असे असतानाही आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषा ओलांडल्याच्या आरोपावरून श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांनी मच्छिमारांना अटक केली. जप्त केलेल्या मासेमारी नौका सामूहिक संसाधनातून खरेदी करण्यात आल्या होत्या, असेही राहुल गांधींनी पत्रात लिहिले आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये भाजप पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन करणार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विश्वास

वृत्तसंस्था
जम्मू

जम्मू-काश्मीरमधील दोन टप्प्यांच्या मतदानाने जनमत स्पष्ट झाले असून आता प्रदेशात भाजपचे पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी जम्मू येथे प्रचारसभेत व्यक्त केला.



जम्मू-काश्मीरमधील जनता काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपी या तीन घराण्यांमुळे हैराण झाली आहे. ज्या व्यवस्थेत भ्रष्टाचार आणि नोकऱ्यांमध्ये भेदभाव होता, ती व्यवस्था लोकांना नको आहे. जम्मू-काश्मीरच्या जनतेला आता दहशतवाद, फुटीरतावाद आणि रक्तपात नको आहे. येथील लोकांना शांतता हवी आहे. गेल्या दोन टप्प्यात झालेल्या प्रचंड मतदानाने जम्मू-काश्मीरमधील जनतेचा मूड स्पष्ट झाला आहे. दोन्ही टप्प्यात भाजपच्या बाजूने प्रचंड मतदान झाले आहे. आता भाजप पूर्ण बहुमताने येथे पहिले सरकार स्थापन करणार हे निश्चित आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

सर्जिकल स्ट्राईकचा संदर्भ देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. ते म्हणाले, आजची काँग्रेस पूर्णपणे शहरी नक्षलवाद्यांच्या ताब्यात आहे. काँग्रेस हा असा पक्ष आहे ज्याने आमच्या लष्कराकडून सर्जिकल स्ट्राईकचे पुरावे मागितले होते. काँग्रेस पक्ष आहे जो आजही सर्जिकल स्ट्राईकबाबत पाकिस्तानची भाषा बोलत असल्याचे दिसते. काँग्रेस-नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपी हे राज्यघटनेचे शत्रू आहेत. त्यांनी संविधानाची हत्या केला आहे, असाही घणाघात पंतप्रधानांनी आपल्या भाषणात केला.

# भारताने शाहबाज यांच्या भाषणाला ढोंगी म्हटले...

## पाकिस्तानने बांगलादेशात नरसंहार केला आणि आता असहिष्णुतेबद्दल बोलतायत!

वृत्तसंस्था
नवी दिल्ली




संयुक्त राष्ट्र महासभेत (UNGA) पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांच्या आरोपांना भारताने प्रत्युत्तर दिले आहे. भारतीय मुत्सद्दी भाविका मंगलानंदन यांनी पाकिस्तानी पंतप्रधानांच्या भाषणाला प्रत्युत्तराच्या अधिकारांतर्गत 'ढोंगी' म्हटले आहे.

मुत्सद्दी भाविका म्हणाल्या की, जगाला बर्याच काळापासून माहित आहे की पाकिस्तानने आपल्या शेजाऱ्यांविरुद्ध सीमापार दहशतवादाचा वापर केला आहे. त्यांनी आमची संसद, आमची आर्थिक राजधानी मुंबई, आमच्या बाजारपेठा आणि तीर्थक्षेत्रांवर हल्ला केला आहे. ही यादी खूप मोठी आहे.

भारतीय मुत्सद्द्याने 1971 च्या हत्याकांडाची आठवण करून दिली मुत्सद्दी भाविका म्हणाल्या की, पाकिस्तानसारख्या देशाने कुठेही हिंसाचारावर बोलणे हा सर्वात मोठा दांभिकपणा आहे. निवडणुकीतील अनियमिततेचा इतिहास असलेला देश लोकशाहीत राजकीय पर्यायांबद्दल बोलतो हे आश्चर्यकारक आहे.

भारतीय प्रतिनिधीने सांगितले की पाकिस्तानने 1971 मध्ये बांगलादेशात नरसंहार केला आणि अजूनही अल्पसंख्याकांवर अत्याचार करत आहे. आता त्यांचे नेते असहिष्णुता आणि फोबियाबद्दल बोलत आहेत.

पाकिस्तानची नजर आमच्या भूमीवर आहे, असेही भारतीय राजनैतिक अधिकारी म्हणाल्या. जम्मू-काश्मीरमधील निवडणुकीत सातत्याने दहशतवादाचा वापर केला आहे.

शाहबाज शरीफ यांचा जुना काश्मीर राग यापूर्वी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी काश्मीरचा मुद्दा यूएनजीएमध्ये उपस्थित केला होता. त्यांनी काश्मीरची तुलना पॅलेस्टाईनशी केली. आपल्या 20 मिनिटांच्या भाषणात शरीफ यांनी कलम 370 आणि बुरहान वाणीचाही उल्लेख केला.

शरीफ म्हणाले होते की, भारत सातत्याने आपली लष्करी ताकद वाढवत आहे. त्याचा वापर तो पाकिस्तानविरुद्ध करू शकतो. एलओसीवर कोणत्याही हल्ल्याला पाकिस्तान प्रत्युत्तर देईल, असा इशारा पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी भारताला दिला.

पाकिस्तानी पंतप्रधान म्हणाले- भारताने कलम ३७० मागे घ्यावे काश्मीरमध्ये शांतता राखण्यासाठी भारताने कलम ३७० चा निर्णय मागे घ्यावा, असे शरीफ म्हणाले. ते म्हणाले की, पॅलेस्टाईनच्या लोकांप्रमाणेच काश्मीरच्या लोकांनीही आपल्या स्वातंत्र्यासाठी शतकभर संघर्ष केला.

पान ९ वरुन

### महात्मा फुले-सावित्रीबाई फुलेंच्या स्मारकाचे लोकार्पण

भुजबळ म्हणाले- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक शहरात 1931 साली गणेशवाडीत अर्धाकृती पुतळा बसविला आहे. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे विशेष कार्य संपूर्ण समाजापर्यंत पोहोचवून ते रुजविण्यासाठी मुंबई-नाका येथील सावित्रीबाई फुले चौकात भव्य दिव्य स्मारक उभारण्यात आले आहे.या स्मारकासाठी संकल्प चित्र तयार करण्यात आल्यानंतर पुतळे उभे किंवा अर्धाकृती करण्यात यावेत, यावर विचार विनिमय करण्यात आला. आजवर विविध ठिकाणी उभे पुतळे निर्माण केले गेले आहेत. ते अतिशय उंच असल्याने त्याची निगा राखणे कठीण होते. त्यामुळे हे पुतळे अतिशय नेटके वाटावे, त्याची व्यवस्थित निगा राखली जावी. यादृष्टीने ब्राँझ धातूचे देशातील सर्वाधिक उंचीचे अर्धाकृती पुतळे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

### राहुल गांधी हे खोटारड्यांचे सरदार

श्रीराम जन्मभूमीविषयी त्यांनी अनेकदा बेताल वक्तव्ये करून हिंदूंच्या ५०० वर्षांच्या संघर्षाचा अपमान केला आहे, असे डॉ. जैन यांनी म्हटले.श्रीराम मंदिराच्या उभारणीत राहुल गांधी व त्यांच्या कुटुंबाने वारंवार अडथळे आणण्याचा प्रयत्न केल्याचे डॉ. जैन यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, हे प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर आता श्रीराम मंदिरासाठी बलिदान देणाऱ्यांचा अपमान त्यांनी सुरू केला आहे. या चळवळीमध्ये जातीभेद विसरून हिंदू समाज एकत्र आल्याचा धक्का काँग्रेसला अद्यापही पचविता आलेला नाही. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमात मंदिराची उभारणी करणारे कामगार आणि कर्मचाऱ्यांसह असंख्य लोक आपली जात विसरून केवळ श्रीरामासाठी एकत्र आले होते. त्यामुळे काँग्रेस आणि राहुल गांधी यांनी हिंदूंचा अपमान करण्याऐवजी भानावर यावे, असाही इशारा विहिंपतर्फे देण्यात आला आहे.

### पारदर्शक व निर्भय वातावरणात विधानसभा निवडणुका

हजार पुरूषांमागे महिलांची संख्या ९१४ वरून ९३६ इतकी वाढली आहे. तसेच १८ ते १९ वयोगटातील नव्याने नोंदणी करण्यात आलेल्या महिलांची संख्या ७.७४ लाख इतकी असल्याचे त्यांनी सांगितले. शंभर पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांची संख्या ४९ हजार ३४ इतकी असून निवडणूक आयोगामार्फत ८५ त्यावरील ज्येष्ठ तसेच दिव्यांग मतदारांसाठी घरपोच मतदान सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ज्येष्ठ मतदार हे मतदान कक्षावर येऊन मतदान करण्यासाठी उत्सुक असतात, हे लोकसभेच्या मतदानाच्या वेळी प्रकर्षाने दिसून आले. ही बाब युवा मतदारांसाठी निश्चितच प्रेरणादायी असल्याचे सांगून राजीवकुमार यांनी नवमतदार तसेच महिला आणि शहरी भागातील मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने मतदान करण्यासाठी पुढे येत मतदानाचा टक्का वाढवावा, असे आवाहन केले. राज्यात एक लाख १८६ मतदान केंद्र असून शहरी भागात ४२ हजार ५८५ तर ग्रामीण भागात ५७ हजार ६०१ मतदान केंद्र असणार आहेत. २९९ मतदान केंद्र हे दिव्यांग संचलित असतील तर ३५० हे युवा संचलित असतील. महिला संचलित मतदान केंद्रांची संख्या ३८८ असेल. प्रत्येक मतदान केंद्रावर मदत केंद्र, दिव्यांगांसाठी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी यासह सर्व आवश्यक ते सहकार्य उपलब्ध करुन देण्याचे नियोजन असल्याचे राजीवकुमार यांनी यावेळी सांगितले.

अति दुर्गम भागात प्रत्येकाच्या घरी जाऊन निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण केले आहे. त्यात कातकरी, कोलम, मारिया गोंड या आदिवासी समाजातील मतदारांची शंभर टक्के नोंदणी करण्यात आलेली आहे. तसेच रोजंदारी कामगारांनाही मतदानासाठी भरपगारी रजा देण्याच्या सूचना आयोगाने संबंधित यंत्रणांना दिल्या आहेत.

# बोर्ड परीक्षा CCTV च्या निगराणीत

## CBSE ची सर्व शाळांना नोटीस

नवी दिल्ली

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात CBSE ने 2025 मध्ये होणाऱ्या 10वी आणि 12वी बोर्डाच्या परीक्षांसाठी सर्व शाळांना परीक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे आदेश दिले आहेत. सीबीएसईशी संलग्न असलेल्या सर्व शाळांना हे नियम लागू होतील.

शाळांच्या मुख्याध्यापकांना पाठवलेल्या नोटीसमध्ये बोर्डाने 10वी-12वीच्या बोर्डाच्या परीक्षा सीसीटीव्हीच्या निगराणीखालीच घेण्यात याव्यात, असे म्हटले आहे. जारी करण्यात आलेल्या नोटीसमध्ये म्हटले आहे की, 'सर्व शाळांना परीक्षा केंद्र बनवण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे. कोणत्याही शाळेत सीसीटीव्ही सुविधा नसल्यास त्या शाळेला परीक्षा केंद्र बनवण्याचा विचार केला जाणार नाही. नोटीसमध्ये म्हटले आहे की, 'परीक्षा शिस्तबद्ध आणि फसवणुकीशिवाय पार पाडण्यासाठी बोर्डाने सीसीटीव्ही धोरण तयार केले आहे. ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही नाहीत आणि ज्या शाळांना बोर्डाचे परीक्षा केंद्र बनवायचे आहे, त्यांनी वेळेत त्यांच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवावेत.

44 लाख विद्यार्थी CBSE बोर्डाच्या परीक्षेला बसणार आहेत बोर्डाच्या म्हणण्यानुसार, यावर्षी सुमारे 44 लाख विद्यार्थी बोर्डाच्या परीक्षेला बसतील. परीक्षेतील अनियमितता टाळण्यासाठी बोर्डाने काही नियमही निश्चित केले आहेत.

# हरियाणात फटाक्यांच्या अवैध कारखान्यात स्फोट

## तिघांचा मृत्यू, 7 जण गंभीररित्या भाजले

वृत्तसंस्था
सोनीपत

हरियाणातील सोनीपतमध्ये बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या फटाक्यांच्या कारखान्यात भीषण आग लागली. या आगीत 3 जणांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत 3 मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. यापैकी एक मृतदेह गावातील महिलेचा, दुसरा मुलाचा आणि तिसरा दुसऱ्या महिलेचा आहे.

कारखान्यात भीषण स्फोट झाल्यानंतर गावकऱ्यांना अपघाताची माहिती मिळाली. स्फोटामुळे लगतच्या घरांच्या भिंतींना तडे गेले. ज्या घरामध्ये फटाके बनवले जात होते ते घरही कोसळले आणि कामगार ढिगाऱ्याखाली गाडले गेले. येथे 10-12 मजूर काम करत होते. या अपघातात सहा महिलांसह सात जण गंभीररित्या भाजले. जळालेल्या मजुरांना रोहतक पीजीआयमध्ये पाठवण्यात आले आहे. गॅस सिलिंडरमधील गळतीमुळे ही आग लागली. हे घर गावाच्या मधोमध असून त्याचा ढिगारा हटविण्याचे काम सुरू आहे.

# न्याय व्यवस्थेने दिव्यांग मुलांच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत

नवी दिल्ली



न्याय व्यवस्थेने अपंग मुलांच्या गरजा समजून घेतल्या पाहिजेत, असे CJI DY चंद्रचूड यांनी शनिवारी सांगितले. माझ्या दोन अपंग मुली आहेत, ज्यांनी जगाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन बदलला आहे.

बाल संरक्षणावरील नवव्या राष्ट्रीय वार्षिक स्टेकहोल्डर कन्सल्टेशन कार्यशाळेत CJI बोलत होते. CJI, केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी आणि न्यायमूर्ती नागरथना यांनी दिव्यांग व्यक्तींवरील हँडबुकचे प्रकाशन केले. यामुळे समाजाला योग्य संज्ञा वापरण्यास मदत होईल. लिंग, जात आणि आर्थिक स्थिती यासह अपंगत्वामुळे आणखी भेदभाव निर्माण होतो सीजेआय म्हणाले की, आमच्या न्याय व्यवस्थेमध्ये पोलिसांपासून ते कोर्टरूमपर्यंत अपंग मुलांच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत. ते म्हणाले की, दिव्यांग मुलांना शारीरिक आव्हानांना सामोरे जावे लागते. तसेच, समाजात असलेल्या गैरसमजांनाही सामोरे जावे लागते. लिंग, जात आणि आर्थिक स्थिती यासह अपंगत्वामुळे आणखी मोठा भेदभाव निर्माण होतो.

# उत्तर प्रदेशात मुसळधार पाऊस, 8 जिल्ह्यांतील शाळा बंद

## बिहारमध्ये पुराचा इशारा, हिमाचलमध्ये 33 रस्ते बंद

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



उत्तर प्रदेशात मुसळधार पावसामुळे 10 जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. अमेठीतील एसपी कार्यालयात पाणी साचले होते. आत अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी अग्निशमन दलाला पाचारण करावे लागले. गोंडा, आंबेडकरनगर, बहराइच, अमेठी, बुलंदशाह, जौनपूर, सुलतानपूर, अयोध्या येथे आठवीपर्यंतच्या शाळा बंद आहेत.

दुसरीकडे बिहारमध्येही मुसळधार पाऊस सुरू आहे. हवामान विभागाने पश्चिम चंपारण, पूर्व चंपारण, अररिया, किशनगंज, गोपालगंजमध्ये रेड अलर्ट जारी केला आहे. त्याचवेळी आपत्ती व्यवस्थापन विभागाने 13 जिल्ह्यांमध्ये पुराचा इशारा जारी केला आहे. कटिहारमध्ये सलग दुस-या दिवशी गंगा आणि कोसी नद्यांना उधाण आले आहे.

येथे, हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे 33 रस्ते बंद झाले आहेत. यापैकी सिरमौरमध्ये 12, कांगडामध्ये 10, मंडीमध्ये 8, कुल्लूमध्ये 2 आणि शिमलामध्ये 1 रस्ते बंद आहेत. आपत्ती व्यवस्थापन विभागाने सांगितले की, पावसाळ्यात पावसाशी संबंधित घटनांमध्ये आतापर्यंत 186 जणांचा मृत्यू झाला आहे. तर 28 जण बेपत्ता आहेत.

# एअर इंडियाच्या विमानात अन्नामध्ये आढळले झुरळ

नवी दिल्ली



दिल्लीहून न्यूयॉर्कला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाच्या नाश्त्यात झुरळ आढळून आले. ही घटना 17 सप्टेंबरची आहे. एका महिलेने इंस्टाग्रामवर पोस्ट करून या प्रकरणाची माहिती दिली. प्रवासी महिलेने सांगितले की तिला आणि तिच्या 2 वर्षाच्या मुलाला अन्नातून विषबाधा झाली. आता ती एअर इंडियाच्या विमानातून प्रवास करणार नाही. या प्रकरणाची चौकशी करणार असल्याचे एअर इंडियाने म्हटले आहे. जेवण देणाऱ्या एजन्सीशीही बोलणार असल्याचे एअर इंडियाने सांगितले आहे.

# कॅनडात महाराजा रणजित सिंग यांच्या पुतळ्याशी छेडछाड

वृत्तसंस्था
ओटावा



कॅनडातील ब्रॅम्प्टन प्रांतातील महाराजा रणजित सिंग यांच्या पुतळ्यावर काही पॅलेस्टिनी हल्लेखोरांकडून हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आरोपींनी महाराजा रणजित सिंग यांच्या पुतळ्यावर पॅलेस्टाईनचा झेंडाही लावला होता.

त्याचा व्हिडीओ समोर आल्यानंतर सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. हा व्हिडिओ एका कॅनडाच्या पत्रकाराने शेअर केला आहे. पत्रकाराने हे कृत्य करणाऱ्या बदमाशांना जिहादी संबोधले आहे. व्हायरल होत असलेला व्हिडिओ सुमारे 37 सेकंदांचा आहे. ज्यामध्ये महाराजा रणजित सिंग यांच्या पुतळ्यावर चढलेले दोन युवक त्यांच्या घोड्यावर पॅलेस्टाईनचा झेंडा लावत आहेत. दोन्ही तरुणांनी तोंड झाकले होते आणि खाली अनेक लोक उभे होते. तसेच महाराजा रणजित सिंग यांच्या घोड्यावर एक व्यक्ती कापड बांधताना दिसली. अनेकांनी या संपूर्ण घटनेचा व्हिडिओही बनवला आहे. या संपूर्ण प्रकरणाची माहिती कॅनडाच्या पील पोलिसांना देण्यात आली आहे. आता याचा तपास कॅनडाच्या पोलिसांकडून केला जात आहे.

# हरियाणामध्ये तिसऱ्यांदा भाजपचेच सरकार येणार - आठवले

वृत्तसंस्था
सोनीपत




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची हॅट्ट्रीक केली आहे.त्याचप्रमाणे हरीयाणा मध्ये भाजप सरकार तिसऱ्यांदा बहुमताने निवडुन येईल.हरीयाणातीळ सर्व 90 जागांवर रिपब्लिकन पक्षाने भाजपला पाठिंबा दिला आहे.हरीयाणातील दलित जनता भाजपला कौल देणार असल्यामुळे हरीयाणात तिसऱ्यांदा भाजपचे बहुमताने सरकार येईल असा विश्वास रिपब्लिकन पक्षाने राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला. हरियाणा विधानसभा निवडणुकीत गनौरचे भाजप उमेदवार देवेंद्र कौशिक यांच्या प्रचारार्थ रामलिला मैदानावर आयोजित जाहिर सभेत ना.रामदास आठवले बोलत होते.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे प्रदेशअध्यक्ष रवि ऊर्फ सोनु कुंडली,माजी खासदार रमेश कौशिक,आमदार श्रीमती निर्मला चौधरी,अरूण त्यांगी,मनिष, मनोज सिंधीया आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत संविधान आणि आरक्षणाच्या मुद्यावर काँग्रेस आणि विरोधकांनी भाजपवर खोटे आरोप केले होते.त्यामुळे लोकसभा निवडणुकीत भाजपचे काही प्रमाणात नुकसान झाले.संविधान आणि आरक्षणाच्या मुद्यावर काँग्रेसने केलेले आरोप हे खोटे आरोप होते हे आता सिध्द झाले आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत विरोधकांचा संविधान बदलण्याचा मुद्दा चालणार नाही.आरक्षणा बाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आरक्षण संपवण्याचे केलेल्या व्यक्तव्यामुळे दलितांमध्ये त्यांच्या विरुध्द तीव्र संताप आहे.त्यामुळे हरियाणा मधील दलित जनता भाजपच्या पाठिशी ठामपणे उभी आहे. या विधानसभा निवडणुकीत हरीयाणात भाजपचे सरकार तिसऱ्यांदा निवडून येईल. असे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संविधान मजबुत करीत आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल मोदींना प्रेम आहे.काँग्रेसने वर्षानुवर्ष भावनिक करुन दलितांची फसवणुक केली आहे.आरक्षण संपवण्याची भाषा करणाऱ्या राहुल गांधी आणि त्यांच्या काँग्रेसला दलित जनता विधानसभा निवडणूकीत धडा शिकवणार आहे.रिपब्लिकन पक्षाने हरीयाणातील सर्व जांगावर भाजपला पाठिंबा दिला असल्याने येथील जनता विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा धुवा उडवेल असा विश्वास ना.रामदास आठवले यावेळी व्यक्त केला.

# काश्मीरमध्ये 2 दहशतवादी ठार

## चकमकीत 4 सुरक्षा कर्मचारी जखमी

वृत्तसंस्था
श्रीनगर



काश्मीरमधील कुलगाममधील आदिगाम देवसर भागात शनिवारी सकाळपासून सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. दुपारी सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार केले. या परिसरात दोन-तीन दहशतवादी लपून बसल्याचा संशय होता. लष्कराचे ३ जवान आणि कुलगामचे एएसपी जखमी झाले आहेत. चौघांनाही उपचारासाठी श्रीनगरला हलवण्यात आले आहे.

सुरक्षा दलांनी आदिगाममध्ये शोधमोहीम राबवली होती. दरम्यान, दहशतवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला, परिणामी चकमक झाली.

दुसरीकडे, पोलिसांनी शुक्रवारी अवंतीपोरा, पुलवामा येथे एका दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केला. जैश-ए-मोहम्मदच्या 6 दहशतवादी साथीदारांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून 5 आयईडी, 30 डिटोनेटर्स, आयईडीच्या 17 बॅटरी, 2 पिस्तूल, 3 मॅगझिन, 25 राउंड, 4 हातबॉम्ब आणि 20 हजार रुपये रोख जप्त करण्यात आले आहेत.तरुणांच्या मदतीने हल्ला करण्याचा कट होता पोलिसांनी सांगितले की, जैश-ए-मोहम्मदचा दहशतवादी अशा तरुणांचा शोध घेत असल्याची माहिती त्यांना मिळाली होती, ज्यांचा दहशतवादी संघटनेत समावेश होऊ शकतो. तरुणांचे ब्रेनवॉश करून त्यांना दहशतवादी कारवायांसाठी शस्त्रे आणि दारूगोळा दिला जाऊ शकतो. तरुणांच्या माध्यमातून दहशतवादी हल्ले घडवून आणण्याचा कट होता. पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी या तरुणांच्या मदतीने आयईडी पेरण्यासाठी काही ठिकाणेही निवडली होती. त्या तरुणांना हँडलर आणि आयईडी बनवण्यासाठी पैसेही देण्यात आले, जेणेकरून ते यासाठी साहित्य आणू शकतील. तरुणांना दहशतवादी गटात सामील होणे सोपे व्हावे यासाठी त्यांना पिस्तूल, ग्रेनेड, आयईडी देण्यात आले. तरुणांना दहशतवादी गटात सामील करण्यापूर्वी त्यांना टार्गेट किलिंग, एसएफ, सार्वजनिक ठिकाणी ग्रेनेड फेकणे, गैर-काश्मीरी मजूर आणि आयईडी स्फोट यांसारख्या दहशतवादी कारवाया करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.